# महाराष्ट्र विधानसभा

**तिसरे अधिवेशन, २०२४**

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**राज्यात महिलांवरील अत्याचारातील गुन्हात वाढ झाल्याबाबत**

**(१) ४७९६१ (३०-१०-२०२२). श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०२० या कालावधीच्या आकडेवारीनुसार महिलांवरील अत्याचाराच्या गुन्ह्यांची संख्या ४ हजार १०० होती तसेच सन २०२१ या कालावधीत सदर प्रमाण ५ हजार ४९६ इतके झाले असून सुमारे २५.४० टक्के वाढ झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील वर्षी बलात्काराच्या ८८८ गुन्ह्यांची नोंद होती तर त्यापूर्वीच्या सन २०२० या कालावधीत ही संख्या ६९३ होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार महिलांवरील अत्याचाराच्या गुन्ह्यांचा आढावा घेऊन सदर गुन्हे रोखण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या वा कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०७-२०२४) :** (१) क्राईम इन इंडिया २०२० व २०२१ अहवालानुसार महिलांवरील अत्याचाराबाबत दाखल गुन्ह्यांची संख्या खालीलप्रमाणे आहे.

| सन | २०२० | २०२१ |
|---|---|---|
| दाखल गुन्हे | ३१९५४ | ३९५२६ |

सन २०२० च्या तुलनेत सन २०२१ मध्ये २३.६९ टक्केने वाढ झालेली आहे.

(२) क्राईम इन इंडिया २०२० व २०२१ अहवालानुसार बलात्कार शिर्षाखाली दाखल गुन्ह्यांची संख्या खालीलप्रमाणे आहे.

| सन | २०२० | २०२१ |
|---|---|---|
| दाखल गुन्हे | ४८४६ | ५९५४ |

(३) महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी महिला सहाय्य कक्ष स्थापन करण्यात आले आहे. महिला व बालकांवरील अत्याचारांची प्रकरणे निकाली काढण्याकरिता राज्यात विशेष न्यायालये व जलदगती न्यायालये स्थापन केले आहेत. तसेच सर्व पोलीस घटकामध्ये पोलीस काका, पोलीस दिदी, निर्भया पथक, दामिनी पथक, भरोसा सेल कार्यरत आहेत. गंभीर गुन्ह्यांच्या बाबत मानक कार्यप्रणाली (SOP) जारी करणे, छेडछाड व विनयभंगाच्या घटना रोखण्यासाठी महिला छेडछाड विरोधी पथके निर्माण करण्यात आलेली आहेत.

(४ )प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर शहरात प्लॉट धारकांनी महानगरपालिकेकडे नोंद केली नसल्याबाबत

**(२) ५१९५७ (२७-०१-२०२३). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेने शहरातील मालमत्तांचा सर्व्हे केला असता त्यात साडेसहा लाखांहून अधिक मालमत्ता असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यातील ७५ हजार ५९६ प्लॉटधारकांनी महानगरपालिकेकडे नोंद केली नसल्याने मालमत्ता कर विभागाकडे त्याचे अभिलेखे उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तसेच या प्लॉटधारकांकडे मालमत्ता कराची तब्बल २८४ कोटी ६६ लाखांची थकबाकी असून या थकबाकी वसूलीसाठी मालमत्ता कर विभागाने प्लॉट विक्रीची प्रक्रिया सुरु केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, थकबाकीदार प्लॉटधारकांनी प्लॉटची झोन कार्यालयाकडे नोंद करुन विक्रीची कारवाइ टळावी यासाठी या प्लॉटधारकांना मार्गदर्शन व मुदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-०७-२०२४) :** (१) हे खरे आहे.

दिनांक ३१.०७.२०२३ पर्यंत नागपूर महानगरपालिका सीमा क्षेत्रात असलेल्या एकूण मालमत्तांची संख्या ६,७९,३५९ आहे.

(२) हे अंशतः खरे आहे.

नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील इमारत व जमीनीकरीता जी.आय.एस. करतांना भूखंडधारकांनी मालमत्ता कर निर्धारण करून घेणे बाबत माहिती घोषित न केलेले ७५,५९६ खुले भूखंड नागपूर महानगरपालिकेच्या मालमत्ता कर निर्धारण कक्षेत नसल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) हे अंशतः खरे आहे.

नागपूर महानगरपालिकेच्या १० झोन पैकी ८ झोन अंतर्गत असलेल्या या ७५,५९६ भुखंडधारक/प्लॉटधारक द्वारा मालमत्ता कर विभागात नोंद केली नसल्याने पुर्वलक्षी प्रभावाने मालमत्ता कराची एकूण रक्कम रु.२८४.०६ कोटी थकित असल्याचे निदर्शनास आले होते. त्याअनुषंगाने दिनांक ०८.०९.२०२२ रोजी वर्तमानपत्राद्वारे व महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर भुखंडनिहाय माहिती उपलब्ध करुन देवून नागरिकांनी थकित मालमत्ता कर जमा करण्याबाबत आवाहन करण्यात आले.

(४) सर्व ७५,५९६ भुखंडाची यादी नागपुर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात आली व याबाबत स्थानिक वर्तमानपत्रात बातमी प्रकाशित करण्यात आली. त्यापैकी ११,८८४ भुखंडधारकांनी दखल घेऊन मालमत्ता कर जमा केला आहे

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## देसाईगंज, येथील प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) लाभार्थ्यांचे तिसऱ्या टप्प्यातील अनुदान मिळण्याबाबत

**(३) ५९४१८ (०३-०५-२०२३). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देसाईगंज, (जि. गडचिरोली) येथील, प्रधानमंत्री आवास योजनेतील (शहरी) ८०९ लाभार्थ्यांचे तिसऱ्या टप्प्यातील प्रति लाभार्थी रु. ९० हजार रुपये प्रमाणे एकुण ७ कोटी २८ लक्ष १० हजार रुपयांचे अनुदान प्रलंबीत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ च्या दुसऱ्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर लाभार्थ्यांचे प्रलंबीत असलेले अनुदान मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अतुल सावे (३०-०५-२०२४) :** (१), (२) व (३) प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समिती (CSMC) कडून BLC घटक क्र. ४ मध्ये अनुक्रमे डी.पी.आर. मधील ११६,३९३ व ३०० अशा एकूण ३ प्रकल्पांना मंजूरी दिली असून सदरच्या प्रकल्पांना वितरीत केलेल्या निधीचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ.क्र. | शहर | घटक | मंजूर घरकुले | केंद्र शासनाचा अनुज्ञेय निधी (रु.लक्ष) | राज्य शासनाचा अनुज्ञेय निधी (रु. लक्ष) | वितरीत केलेला केंद्र शासनाचा निधी (रु.लक्ष) | वितरीत केलेला राज्य शासनाचा निधी (रु.लक्ष) | केंद्र शासनाकडून राज्य शासनास अप्राप्त निधी (रु. लक्ष) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | देसाईगंज | ४ | ११६ | १७४.०० | ११६.०० | १३९.२ | ११६.०० | ३४.८ |
| २ | देसाईगंज | ४ | ३९३ | ५८९.५० | ३९३.०० | ४७१.६ | ३९३.०० | ११७.९ |
| ३ | देसाईगंज | ४ | ३०० | ४५०.०० | ३००.०० | १८०.०० | ३००.०० | २७०.०० |

देसाईगंज येथील मंजूर तीन प्रकल्पांना राज्य हिश्याचा १०० % निधी वितरीत करण्यात आला आहे. तर पहिल्या दोन प्रकल्पांना केंद्र हिश्याचा ८०% निधी व तिसऱ्या प्रकल्पास केंद्र हिश्याचा ४०% निधी वितरीत करण्यात आला आहे. उर्वीरत निधी वितरणाची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील महालक्ष्मी येथे टाटा वीज निर्मिती कंपनीच्या सहकार्याने विवेरिया कॉण्डोमिनियम सोसायटीतर्फे ग्राहकांच्या सोयीसाठी सौर ऊर्जा प्रकल्प राबविण्याबाबत

**(४) ६००६० (०३-०५-२०२३). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दक्षिण मुंबईतील महालक्ष्मी येथे टाटा वीज निर्मिती कंपनी (TPREL) या सौरऊर्जा निर्मिती कंपनीच्या सहकार्याने विवेरिया कॉण्डोमिनियम या सोसायटी तर्फे भारतात प्रथमच सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यात येत असल्याचे दिनांक १३ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकल्पातून किती मेगावॅट वीज निर्मिती होणार आहे व त्यातून सोसायटीला लागणाऱ्या वीज निर्मितीची किती गरज भागून त्यातून किती मेगावॅट वीज शिल्लक राहणार तसेच सदर प्रकल्पाचे काम किती कालावधीत पूर्ण होऊन त्याकरिता किती खर्च अपेक्षित आहे,
(३) असल्यास, भारतात प्रथमच पर्यावरण रक्षण आणि संवर्धनाबरोबरच प्रदुषणमुक्त वीज न्र्मिती प्रकल्प उभारण्यात येत असून सध्याची वीजेची टंचाई विचारात घेता सौर उर्जैला प्रोत्साहन देऊन सौर उर्जा प्रकल्पास आर्थिक सहाय्य देण्याबाबत शासनातर्फे विशेष सौर योजना राबविण्याण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०२४) :** (१) होय.
(२) सदर प्रकल्पातून ३.१२५ मेगावॅट क्षमतेची वीज निर्मिती होणार आहे. प्रकल्प ८ जून २०२३ रोजी कार्यान्वित झालेला असून प्रकल्पाची किंमत २२.०४ कोटी इतकी आहे.
(३) शासनाने दि. ८ मे, २०२३ च्या शासन निर्णयान्वये मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० जाहिर केली असून त्याअंतर्गत एकूण ७००० मेगावॅट क्षमतेचे विकेंद्रित सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यात येणार असून योजनेअंतर्गत ११ के.व्ही/२२के.व्ही आणि ३३ के.व्ही फिडरवर वीज जोडणी करणाऱ्या प्रकल्प विकासकांना अनुक्रमे रु. ०.२५ व रू. ०.१५ प्रति युनिट प्रोत्साहनात्मक आर्थिक सहाय्य प्रकल्प कार्यान्वित झाल्याच्या दिनांकापासून ३ वर्षाच्या कालावधीसाठी देण्यास येणार आहे. तसेच शासन निर्णय दि. ३० जुन, २०२२ अन्वये अपारंपारिक ऊर्जा निर्मिती धोरण-२०२० अंतर्गत उद्योगांनी स्वयंवापरासाठी सौर, पवन, शहरी व औद्योगिक घन कचरा ऊर्जा निर्मिती व ऊसाच्या चिपाडावर आधारित वीज निर्मिती प्रकल्प आस्थापित केल्यास त्यातून निर्माण झालेल्या विजेवर प्रकल्प कार्यान्वित झालेल्या दिनांकापासून पहिल्या १० वर्षापर्यंत विद्युत शुल्क माफ आणि सौर व पवन वीज निर्मिती प्रकल्पांसाठी बिगर शेती कर माफ करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आष्टी तालुक्यातील जाम नदीवर नवनिर्मित मध्यम सिंचन प्रकल्प निर्माण करण्याबाबत**

**(५) ६१००७ (०८-०५-२०२३). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आष्टी तालुक्यातील मौजा थार, चामला, बांबर्डा, बोरखेडी, किन्ही मोई, मुबारकपुर व कारंजा तालुक्यातील बोटोणा, पारडी, एकांबा ही गावे डोंगराळ भागात वसलेले असून त्या ठिकाणी पर्जन्यमान हे अत्यंत कमी असते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या भागात पिण्याच्या पाण्याची व सिंचनाची कोणतीही सोय नाही. त्यामुळे तेथील शेतकऱ्यांना दरवर्षी आर्थिक नुकसानीचा सामना करावा लागत असून या दुष्काळ ग्रस्त गावातील जनतेचा उदरनिर्वाह शेतीवर असून त्या सोबत जोड व्यवसाय म्हणून शेतकरी पशुपालन व दुग्ध व्यवसाय करत आहे, हे खरे आहे काय ,
(३) असल्यास, या दुष्काळ ग्रस्त भागात पाण्याचा तुटवडा असल्यामुळे तेथील शेतकऱ्यांना व पशुपालकांना दरवर्षी बाहेर गावी स्थालंतरण करावे लागते, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, या भागातील शेतकऱ्यांचे जिवनमान उंचाविण्याकरिता जाम नदीवर नवनिर्मीत मध्यम सिंचन प्रकल्प निर्माण करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आला आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०६-२०२४) :** (१) हे खरे नाही.
सन २०२३ मध्ये वर्धा जिल्हयामध्ये सरासरी पर्जन्यमान १०८४.४० मी.मी. इतके असून आष्टी तालुक्यातील सरासरी पर्जन्यमान ७१९.०० मी.मी. इतके आणि कारंजा तालुक्यातील सरासरी पर्जन्यमान ७७९.८० मी.मी. इतके आहे.
(२)सदर गावामध्ये खालीलप्रमाणे पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध आहे.
i) थार या गावामध्ये ०४ विहीरीवरुन पाणी पुरवठा सुरु आहे.
ii ) चामला व बांबर्डा मध्ये १ स्वतंत्र विहीर असून त्या विहीरीमधून ०८ महिने पाणी पुरवठा केला जातो व उर्वरीत ०४ महिने प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनेतून केला जातो.
iii) मुबारकपूर गावांमध्ये अस्तित्वातील स्त्रोतामधून पाणी पुरवठा केला जातो.
iv ) कार धरणावरुन नारा व २२ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना कार्यरत असून त्या योजनेव्दारे एकांबा, बोटोणा व पारडी या गावात पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

(३) सदर गावामध्ये पिण्याच्या पाण्याचा वरीलप्रमाणे पुरेशा प्रमाणात पाणी पुरवठा केला जातो.
(४) उपरोक्त मुद्दा १ मध्ये नमुद क्षेत्र हे उर्ध्व वर्धा प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात वर्धा उपखो-यात येते व या क्षेत्रात, नविन प्रकल्पासाठी पाणी उपलब्ध नसल्यामुळे नव्याने कुठल्याही प्रकल्पाची कामे प्रस्तावित केलेली नाहीत.

तथापि, मृद व जलसंधारण विभागातंर्गत धानोरा (बोटोना) तालुका कारंजा जिल्हा वर्धा या पाझर तलावास महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद यांच्या दिनांक २१.०२.२००९च्या शासननिर्णया नुसार प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली होती. प्रस्तावित तलावाचा पाणीसाठा २८०.४८सघमी इतका आहे. सदर पाझर तलावाचे बुडीत क्षेत्रात वन विभागाची २.९३ हेक्टर इतकी येत असल्यामुळे वन विभागाच्या नाहरकत प्रमाणपत्रासाठी कार्यवाही करण्यात आली आहे. तहसिलदार कारंजा (घा) यांनी प्रस्ताव उपविभागीय अधिकारी (महसूल), आर्वी यांना सादर केला आहे. त्यादरम्यान सदर तलावाची प्रशासकीय मान्यता महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद यांच्या दिनांक ३१.१२.२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये रद्द करण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत स्थानिक लोकांच्या मागणीनुसार शासन अंतर्गत २ कोल्हापूरी बंधाऱ्यांना प्रशासकीय मान्यता प्राप्त असून जाम नदी क्षेत्रातील ३ नविन को.प. बंधाऱ्यांचे सर्वेक्षण सुरु आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जामखेड (जि.अहमदनगर) तालुक्यातील घरकुले रद्द न करण्याबाबत**

**(६) ६२४६३ (२७-०४-२०२३). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.राजेश एकडे (मलकापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जामखेड (जि.अहमदनगर) तालुक्यातील माहे फेब्रुवारी/मार्च,२०२२ मधील मंजूर सर्वच घरकूल योजनांचे ६०० लाभार्थ्यांनी पहिला हप्ता देऊनही घरकुलाचे बांधकाम अद्याप केलेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे शासन एकतर्फी कारवाई करुन ही घरकुले रद्द करणार असल्याने या लाभार्थ्यांमध्ये चिंता व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वास्तवात राज्यात गेली काही वर्षे कोरोना काळ होता व त्यामुळे जनतेची आर्थिक स्थिती रोजगाराअभावी कमी झाल्यामुळे ही घरकुले होऊ शकलेली नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, केलेल्या चौकशीच्या अनुषंगाने निर्णय घेऊन ही घरकुले रद्द न करणे व अनुदान वसूलीला स्थगिती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (१८-०६-२०२४) :** (१) जामखेड येथे प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत AHP-PPP अंतर्गत २८० घरकुलांचा एक प्रकल्प व BLC अंतर्गत ११३८ घरकुलांचे दोन प्रकल्प मंजूर आहेत. सुधारीत प्रकल्प अहवालानुसार BLC अंतर्गत घरकुलाची संख्या कमी करण्यात आली असून, जामखेड येथील AHP-PPP प्रकल्पांसाठी केंद्र व राज्य हिश्याचे दोन हफ्ते (८०%) वितरित करण्यात आले आहेत. तर, BLC प्रकल्पांसाठी यापूर्वी जवळ-जवळ १००% निधी वितरित करण्यात आला होता. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, सुधारित PFMS प्रणालीमार्फत निधी वितरित करताना, ज्या स्थानिक स्वराज्य संस्थाकडे अखर्चित निधी शिल्लक होता, तो Pull Out करण्यात आला आहे. सद्यस्थितीत राज्यशासनाकडे केंद्र व राज्य हिश्याचा निधी उपलब्ध असून, मागणीनुसार Limit देण्यात येते.

(२) व (३) जामखेड नगरपरिषदेमधील AHP-PPP प्रकल्पांमधील घरकुले कमी करण्यात आली नाहीत. BLC प्रकल्पातील मुळ मंजूर घरकुले, सुधारीत घरकुले व Deemed Cancellation नंतर राहणाऱ्या घरकुलांची संख्या पुढीलप्रमाणे :-

| अ क्र | प्र. आ. यो. घटक | | मंजुर घरकुले | सुधारीत मंजुर घरकुले | Deemed Cancellationनंतरची घरकुले | प्रगती पथावरील घरकुले | पूर्ण झालेली घरकुले |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | BLC | ९३३ | ५३८ | ५३२ | २४७ | २६७ | |
| २. | BLC | २०५ | ९३ | ५२ | ४१ | ०० | |
| एकूण | | ११३८ | ६३१ | ५८४ | २८८ | २६७ | |

कामे सुरु न करण्यात आलेली घरकुले रद्द करण्यात येणार असल्याबावत लाभार्थ्यांना पूर्व कल्पना देण्यात आली होती.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही

---

## गडचिरोली नगरपालिका अंतर्गत पंतप्रधान आवास योजनेचे मंजूर डी.पी.आर मध्ये केंद्र व राज्य शासनामार्फत निधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(७) ६२६२० (२४-०४-२०२३). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली नगरपरिषद अंतर्गत मंजूर डीपीआर दिनांक २० जानेवारी,२०२१ मधील एकूण २५५ घरकुल मंजूर झालेले असून त्यामधील केंद्र शासनामार्फत दिला जानारा निधी अद्याप प्राप्त झालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याचप्रमाणे मंजूर डीपीआर दिनांक २३, डिसेंबर, २०१९ मधील ५१ तसेच दिनांक २३ डिसेंबर, २०२१ मधील १६७ व १२३ घरकुल मंजूर झालेले असून त्यालाही केंद्र शासनाचा व राज्य शासनाचा निधी प्राप्त झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील अनेक दिवसांपासून निधी उपलब्ध न झाल्याने मंजूर घरकुलधारक मोठ्या आर्थिक अडचणीत सापडले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी मंजुर घरकुलांना निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (३०-०५-२०२४) :** (१) हे खरे नाही.

सदर प्रकल्पाला केंद्र शासनाचे पहिल्या टप्प्याचे प्रती लाभार्थी रुपये ६००००/- प्रमाणे एकूण १०३.८० लक्ष निधी वितरित करण्यात आला आहे.

(२), (३) व (४) गडचिरोली नगरपरिषदे अंतर्गत मंजूर ५१ व १२३ आणि १६७ घरकुलांच्या प्रकल्पास निधी प्राप्त झाला असून त्यांना वितरित केलेल्या निधीचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

| अ . क्र . | शहर | लाभार्थ्यांची संख्या | PMAY MIS Portal व र संलग्न केलेले लाभार्थ्यांची संख्या | वितरित केलेल्या राज्य शासनाचा निधी | वितरित केलेल्या केंद्र शासनाचा निधी | सुधारित DPR प्रमाणे मंजूर लाभार्थ्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | गडचिरोली | ५१ | ४८ | ४८.०० | २८.८० | ४३ |
| २ | गडचिरोली | १२३ | १०३ | १०२.०० | ६१.२० | ६७ |
| ३ | गडचिरोली | १६७ | ११८ | ११२.०० | ६७.२० | ११८ |

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील पत्रकारांसाठी स्वतंत्र कल्याणकारी मंडळ स्थापन करण्याबाबत**

**(८) ६४७२१ (३१-०८-२०२३). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पत्रकारांसाठी स्वतंत्र कल्याणकारी मंडळ स्थापन करुन त्यास भरीव निधी द्यावा यासाठी नांदेड येथील पत्रकारांनी दिनांक ११ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास नांदेडमधील प्रत्येक तहसिल व जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करुन मा. जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच यावल (जि.जळगाव) येथील तहसिल कार्यालयावर, राज्यातील पत्रकारांसाठी स्वतंत्र कल्याणकारी महामंडळाची स्थापना करण्यासह विविध मागण्यांसाठी पत्रकारांच्या संघटनेने दिनांक ११ मे,२०२३ रोजी वा त्यासुमारास धरणे आंदोलन केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त दोन्ही प्रकरणात शासनाने चौकशी करुन पत्रकारांच्या मागण्या मान्य करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-०७-२०२४) :** (१) व्हॉइस ऑफ मिडिया या पत्रकार संघटनेने दिनांक ११.०५.२०२३ रोजी तहसिल कार्यालय धर्माबाद जि. नांदेड येथे धरणे आंदोलन करुन तहसिल कार्यालयास निवेदन सादर केले आहे.

(२) व्हॉइस ऑफ मिडिया या पत्रकार संघटनेने दिनांक ११.०५.२०२३ रोजी जळगांव येथील जिल्हा माहिती कार्यालयासमोर धरणे आंदोलन करुन त्यांच्या विविध मागण्यांचे निवेदन सादर केले आहे.

(३) महाराष्ट्र राज्यातील पत्रकारांच्या विविध मागण्यांचा अभ्यास करण्याकरीता सामान्य प्रशासन विभाग क्र. मावज २०२३/प्र.क्र. २४९/ मावज-१, दिनांक ५.१२.२०२३ रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये अभ्यासगट नेमण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातंर्गत पुनर्विकासातील घरे १० वर्षाऐवजी ७ वर्षाने विक्री करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय

**(९) ६४७३८ (१०-१०-२०२३). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातंर्गत पुनर्वसन करण्यात आलेली घरे १० वर्षे ऐवजी ७ वर्षाने विक्री करण्यास राज्य शासनाने मान्यता दिली असल्याची बाब दि. २९ मार्च, २०२३ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे नियमांचे उल्लंघन करुन अद्यापपर्यंत किती घरांचे नियमबाह्यरित्या हस्तांतरण करण्यात आले आहे, तसेच उपरोक्त निर्णयानुसार अद्यापर्यत किती घरांची हस्तांतरणाची कार्यवाही केली आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने पुनर्वसन प्राधिकरणातंर्गत पुनर्वसन करण्यात आलेली घरे ७ वर्षांनी विक्री करण्याकरिता महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र अधिनियम १९७१ मध्ये सुधारणा करुन शासन निर्णय लागू करुन त्याची अमंलबजावणी करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अतुल सावे (२०-०६-२०२४) :** (१) हे खरे नाही.

(२) सुमारे १३५६४ सदनिकांचे नियमबाहयरित्या हस्तांतरण झालेले आहे.

(३) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत देण्यात आलेल्या पुनर्वसन सदनिका वाटप झाल्यापासून १० वर्षे ऐवजी ५ वर्षे होईपर्यंत विकता येणार नाही, असा बदल महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र अधिनियम १९७१ च्या कलम ३ (ई) मध्ये दिनांक १९.०१.२०२४ च्या शासन राजपत्रान्वये करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील ढग्याचा बंगला ते नाल्यापर्यंतच्या मार्गाची झालेली दूरवस्था

**(१०) ६४७९८ (३१-०८-२०२३). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील हुडकेश्वर पोलीस ठाण्यासमोरील पिंपळा रस्त्यावरील ढग्याचा बंगला ते नाल्यापर्यंतच्या मार्गावर टाकण्यात येत असलेल्या सिल्व्हर लाईनच्या कामामुळे सदरहू रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली असल्याने स्थानिक नागरिकांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत असल्याची बाब दिनांक ३१ मे, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू सिल्वर लाईनचे काम माहे जानेवारी, २०२३ पासून अत्यंत संथगतीने सुरु असून, ठेकेदाराने सदर काम विहित मुदतीत पुर्ण केलेले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रस्त्याची पाहणी आणि कामाची चौकशी शासनाने केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू सिल्व्हर लाईनचे काम विहित मुदतीत पूर्ण न करणाऱ्या संबधित ठेकेदार आणि सदरहू कामावर निगराणी करणाऱ्या नागपूर महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांवर शासनाने कारवाई करुन उक्त रस्त्यांचे काम तातडीने पुर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०४-०७-२०२४) :** (१) हे अंशतः खरे आहे.

नागपूर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील हुडकेश्वर पोलिस ठाण्यासमोरील पिंपळा रस्त्यावरील ढग्याचा बंगला ते नाल्यापर्यंतच्या मार्गावर महानगरपालिकेमार्फत पावसाळी नाली टाकण्याचे काम दिनांक २८.०३.२०२३ रोजी पुर्ण झाले आहे. कंत्राटदारामार्फत रस्त्यावरील अनावश्यक माती व निरुपयोगी बांधकाम साहित्य उचलण्यात आले असून, खोदकामाचे ठिकाणी सिमेंटीकरण करून रस्ता पूर्वस्थितीत करण्यात आलेला आहे.

(२) हे खरे नाही.

या कामाकरीता दि. ०७.१०.२०२१ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला असून, सदरचे काम एक वर्ष सहा महिन्यांचे कालावधीत पूर्ण करावयाचे होते व हे काम विहित कालावधीत दिनांक २८.०३.२०२३ ला पुर्ण झाले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई महानगरपालिकेचे 'ए' वार्डमधील सहाय्यक अभियंता यांना लाच घेताना लाचलुचपत विभागांने पकडल्याबाबत

**(११) ६४८३७ (२७-०९-२०२३). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेचे 'ए' वार्डमधील सहाय्यक अभियंता श्री.सुनील भारंबे यांस चर्चगेट रेल्वे स्थानकाजवळ एका हुक्का पार्लर व कॅफे विरोधात कारवाई न करण्यासाठी संबंधित मालकाकडून तीन लाखाची मागणी केली असता, त्यातील दोन लाख रुपयाची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिनांक ६ मे २०२३ रोजी वा त्या सुमारास रंगेहाथ पकडलाचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित सहाय्यक अभियंता याची विभागीय चौकशी करण्यात आलेली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले, त्याअनुषंगाने संबधित दोषीवर कोणती कारवाई केली तसेच हुक्का पार्लर व कॅफेवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच, मुंबई महानगरपालिकेमध्ये कर्मचारी वर्गाकडून वाढत असलेल्या लाच घेण्याच्या प्रकाराला आळा बसण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०७-२०२४) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) I. प्रस्तुत प्रकरणी तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने, "ला फ्युम कॅफे व हुक्का बार" या कॅफेच्या आस्थापनेविरुद्ध अनधिकृत पोटमाळयाच्या बांधकामावर निष्कासन कारवाई न करण्यासाठी आलोसे दुय्यम अभियंता (अति.कार्य प्रभारी सहाय्यक अभियंता), बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी रुपये ५,००,०००/- इतकी व तडजोडीअंती रु.३,००,०००/- इतक्या रकमेच्या लाचेची मागणी केल्याचे लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत करण्यात आलेल्या पडताळणीअंती निष्पन्न झाले. त्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडुन करण्यात आलेल्या सापळा कारवाईदरम्यान आलोसे दुय्यम अभियंता (अति.कार्य.प्रभारी सहाय्यक अभियंता), बृहन्मुंबई महानगरपालिका यांना रु.२,००,०००/- (रुपये दोन लक्ष फक्त) इतकी लाचेची रक्कम स्विकारतांना पकडण्यात आल्याने त्यांच्याविरुद्ध दिनांक ०७.०५.२०२३ रोजी गु.र.क्र.२१/२०२३ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ (सुधारणा) अन्वये नोंद करण्यात आला असून त्यांना त्याच दिवशी अटक करण्यात आलेली आहे. सदर गुन्ह्याचा तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांच्यामार्फत सुरु आहे.

II. सदर प्रकरणी, आलोसे दुय्यम अभियंता (अति.कार्य.प्रभारी सहाय्यक अभियंता), बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याविरुद्ध विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु आहे.

(४) भ्रष्टाचारास आळा बसावा म्हणून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून दरवर्षी “दक्षता जनजागृती सप्ताह” आयोजित करण्यात येतो. शासकीय कार्यालय, बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालये, रुग्णालये, वित्तीय संस्था, पोलीस ठाणे, बेस्ट, एस.टी.आगार अशा शासकीय व निमशासकीय कार्यालय परिसरात दर्शनीय ठिकाणी पोस्टर, बॅनर लावून तसेच लोकनाटयसारखे कार्यक्रम राबवून नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात येते. तसेच लाचखोरीबाबत जास्तीत जास्त तक्रारी करणेबाबत नागरिकांना आवाहन करण्यात येते. तसेच लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत नागरिकांना लाचलुचपतबाबतच्या ऑनलाईन तक्रारीसाठी १०६४ हा टोल फ्री नंबर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात हस्ताक्षर तज्ञांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(१२) ६४८९१ (०३-०९-२०२३). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात न्यायवैद्यक विभागाच्या अखत्यारीत सध्या कार्यरत असलेल्या ४० हस्ताक्षर तज्ञांपैकी १५ पदे गेल्या काही वर्षांपासून रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, न्यायवैद्यक विभागास अजून किमान ३५ हस्ताक्षर तज्ञ कर्मचाऱ्यांची गरज भासत असल्याने सदरची पदे भरण्याबाबत `समर्थन' संस्थेने मा. उप मुख्यमंत्री (गृह), अपर मुख्य सचिव (गृह) यांच्याकडे पत्राद्वारे दिनांक ३ मे, २०२३ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे विनंती केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, गत काही वर्षापासून हस्ताक्षर तज्ञांचा रिक्त पदांमुळे सुमारे ७ हजार ५०० कागदपत्रांची तपासणी झालेली नसल्याने फौजदारी प्रकरणातील हस्ताक्षर तज्ञांचा अहवाल सादर करण्यास विलंब लागत असल्याने शासनाने चौकशी करुन न्यायवैद्यक विभागाच्या अखत्यारीतील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०६-२०२४) :** (१) अपर पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे या कार्यालयाच्या अधिपत्याखालील हस्ताक्षर व छायाचित्रण विभागामध्ये एकुण ४० पदे मंजूर आहेत. यापैकी सहायक शासकीय दस्तऐवज परिक्षकांची एकूण १५ पदे रिक्त आहेत.
(२) होय, हे खरे आहे. तथापि, सदरहु विभाग न्यायवैद्यक विभागाच्या अधिपत्याखाली नाही.
(३) कोरोना कालावधीमध्ये पद भरतीस निर्बंध असल्याने भरती करण्यात आलेली नसून वित्त विभाग, शासन निर्णय क्र. पदनि-२०२२/प्र.क्र.२/२०२२/ आ.पु.क दिनांक ३१/१०/२०२२ नूसार पद भरती वरील निर्बंध शिथिल करण्यात आल्याने सहायक शासकीय दस्तऐवज परिक्षक यांची १५ रिक्त पदे भरणेबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पंढरपूर नगरपालिका (जि.सोलापूर) मार्फत गोरगरिब नागरीकांना प्रधानमंत्री घरकूल आवास योजनेअंतर्गत घराचे वाटप करण्याबाबत**

**(१३) ६४९५६ (२५-०८-२०२३). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रधानमंत्री घरकूल आवास योजनेअंतर्गत पंढरपूर नगरपालिका (जि.सोलापूर) मार्फत घरकूल मिळण्याबाबत तेथील गोरगरिब नागरिकांनी घरे मिळण्याबाबत सन २०१४ पासून मागणी करित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पंढरपूर महानगरपालिकेने ८९२ घरकुले बांधली असून या गोरगरिब नागरीकांना घराचे वाटप न करता, एका विशिष्ट राजकीय पक्षाच्या लोकांना व पदाधिकाऱ्यांना घरकुलांचे वाटप करण्यांत आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यांत आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनूसार पंढरपूर येथील घरकूलांची मागणी सन २०१४ पासून करणाऱ्या गरिब नागरिकांना घरकूल देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यासा, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (१०-०७-२०२४) :** (१)प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत, पंढरपूर,जि.सोलापूर येथे AHP घटकांर्तगत २०९२ EWS घरकुलांच्या प्रस्तावास केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समिती ने (CSMC) दिनांक १९.०४.२०१८ रोजी मान्यता दिली आहे.

(२) हे खरे नाही.

पंढरपूर नगरपरिषदेने जाहीर प्रसिध्दी करुन पहिल्या टप्प्यातील ८९२ घरांचे लाभार्थ्यांना वाटप करणेसाठी दिनांक ०८.०३.२०२१ रोजी ऑनलाईन पध्दतीने सोडत काढली आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र स्थावर संपदा प्राधिकरणाने (महारेरा ) यांच्या अधिकृत संकेतस्थळावर राज्यातील नादारी व दिवाळखोरीची यादी जाहिर केल्याबाबत**

**(१४) ६८५४२ (१०-१०-२०२३). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र स्थावर संपदा प्राधिकरणाने (महारेरा) यांच्या अधिकृत संकतस्थळावरुन राज्यातील नादारी व दिवाळखोरीच्या मार्गावर असलेल्या ३०८ गृहनिर्माण प्रकल्पाची यादी जाहीर केली असल्याचे व यापैकी सर्वाधिक ठाणे जिल्हयातील असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील नोंदणीकृत अनेक प्रकल्प नादारी व दिवाळखोरीच्या अनुषंगाने राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरणाच्या संकेतस्थळावर असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी नागरिकांची फसवणूक होत असल्याने शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (२१-०६-२०२४) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाने (महारेरा) माहे मे,२०२३ मध्ये ३०८ गृहनिर्माण प्रकल्पांची यादी जाहीर केली आहे. त्यापैकी १०० गृहनिर्माण प्रकल्प ठाणे जिल्ह्यातील आढळून आले आहेत.

(३) अशी प्रकरणे महारेराने त्यांच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करून घरखरेदीदार व गुंतवणूकदार यांना जागृत करण्याकरीता जाहीर केली आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर महागनरपालिकेच्या शहर विकास नियोजनाबाबत

**(१५) ६९४३५ (२७-०८-२०२३). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर महापालिकेने २०१५ मध्ये शहर विकासाच्या नियोजनासाठी ३४ हजार ६०४ कोटींचा विकास आराखडा मंजूर केला होता, त्यानुसार २०२१ पर्यत २७ हजार ३५० कोटींची विकास कामे निर्धारित केली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या आराखड्यात सिवेज लाईन, स्टॉर्म ड्रेनेज लाईनसाठी कोणतीच तरतूद केलेली नसल्याचे माहे मे, २०२३ वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन विकासाचे योग्य नियोजन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०४-०७-२०२४) :** (१) हे खरे आहे.

महानगरपालिका ठराव क्र. १०३, दि. १८.०५.२०१५ अन्वये नागपूर शहराचा एकूण रु. ३४६०४ कोटी रुपयाचा सुधारीत शहर विकास आराखडा महासभेद्वारा मंजूर करण्यात आला. सदर आराखड्यात नागपूर शहराकरीता सुविधा पुरविण्यासाठी अल्प मुदतीकरीता म्हणजे सन २०२१ पर्यंत रु. २७३५० कोटी आणि दिर्घ मुदतीकरीता (सन २०२१-२०४१) रु. ७२५३ कोटी इतक्या रकमेची तरतूद करण्यात आली आहे.
(२) हे खरे नाही.

या आराखडयात Sewerage and Sanitation करीता रु. १३६६ कोटी व Storm Water Drain करीता रु. ३६९२ कोटी याप्रमाणे तरतूद होती.
(३) मलनिःसारण व स्वच्छता (Sewerage and Sanitation) अंतर्गत केंद्रशासना मार्फत नाग नदी व तिच्या उपनद्यांचे प्रदूषण कमी करण्याकरिता (Pollution Abatement of Nag River and its tributaries) रु. १९२६.९९ कोटी तसेच अमृत-२.० मध्ये पोहरा नदी व तिच्या उपनद्यांचे प्रदूषण कमी करण्याकरिता (Pollution Abatement of Pohra River) रु. ९५७.०१ कोटींचे प्रकल्पास मंजूरी प्राप्त आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दक्षिण नागपुरातील म्हाळगीनगर जलकुंभावरून पाणीपुरवठा होणाऱ्या अनेक वस्त्यांना कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याबाबत

**(१६) ६९९९३ (०४-०९-२०२३). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरातील पाणीपुरवठा यंत्रणा बळकट करण्यासाठी अमृत योजनेअंतर्गत कोट्यावधी रुपयांचा निधी नागपूर महानगरपालिकेला प्राप्त झाला असला तरी दक्षिण नागपुरातील म्हाळगीनगर जलकुंभावरून पाणीपुरवठा होणाऱ्या अनेक वस्त्यांना कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याने घरोघरी टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरु असल्याची धक्कादायक बाब दिनांक १४ जून, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि दक्षिण नागपुरातील म्हाळगीनगर जलकुंभावरून पाणीपुरवठा होणाऱ्या अनेक वस्त्यांना पुरेशा दाबाने पाणीपुरवठा होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-०७-२०२४) :** (१) हे खरे नाही.

म्हाळगीनगर जलकुंभ कमांड एरीया मध्ये एकुण ९१०० नळ जोडण्या आहे. सर्वसाधारणतः एका कमांड एरिया मध्ये ५५०० ते ६००० हजार नळ जोडण्या अपेक्षित असते परंतु या जलकुंभावर अतिरिक्त नळ जोडण्या असल्यामुळे काही वस्त्यांना कमी दाबाने पाणीपुरवठा होतो. म्हाळगीनगर कमांड एरिया मधे या कालावधीत (जून महिना) ८.५ दशलक्ष घनमिटर प्रतिदिन पाणीपुरवठा करण्यात आला, त्यानुसार सुमारे १२० लिटर प्रतिव्यक्ती पाणीपुरवठा झालेला आहे. कमी दाबाने पाणी पुरवठा होत असलेल्या वस्त्यांमधे पाणीपुरवठयाची तुट भरून काढण्याकरिता या वस्त्यांमधे एका टँकरव्दारे प्रतिदिन १० ते ११ फेऱ्या देण्यात आलेल्या आहेत.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) दक्षिण नागपूरातील म्हाळगीनगर जलकुंभावरुन पाणीपुरवठा होणाऱ्या अनेक वस्त्यांना पुरेशा दाबाने पाणीपुरवठा होण्यासाठी महानगरपालिकेद्वारे खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या आहे:
अमृत योजनेअतंर्गत मेहरबाबा नगर येथे डबल डेकर (ओमकार नगर + म्हाळगीनगर) जलकुंभाचे बांधकाम प्रगतीपथावर असुन एप्रिल-२०२४ पर्यंत पुर्ण करण्यात महानगरपालिका प्रयत्नशील आहे. सदर जलकुंभाचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर म्हाळगीनगर जलकुंभ कंमाड एरिया मधील वस्त्या नव्याने बांधण्यात येणाऱ्या (डबल डेकर) जलकुंभ कमांड एरिया मध्ये घेण्यात येतील, त्यामुळे म्हाळगीनगर जलकुंभावरील वस्त्यांना पुरेशा दाबाने पाणी पुरवठा होऊ शकेल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चेंबुर, सुभाष नगर येथील मे. पोद्दार हौसिंग अँड सत्रे इंनफ्रास्ट्रक्चर प्रा.ली. यांनी झो. पु .प्रा योजनेतील पात्रधारकाना अद्याप घरे बांधून न देता घर भाडे देत नसल्याबाबत.**

**(१७) ७१५३९ (०१-११-२०२३). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चेंबुर, सुभाष नगर येथील मे. पोद्दार हौसिंग अँड सत्रे इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.ली. यांनी झोपडपटटी पुनर्वसन प्राधिकरण योजनेतील पात्रधारकाना अद्याप घरे बांधून न देता घर भाडे देत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी स्थानिक लोकप्रनिधी यांनी दिनांक ३१ जुलै, २०२३ रोजी वा त्या सुमारास मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने दोषी असलेल्या संबंधितांविरुध्द कारवाई करण्यासह सदर योजनेतील पात्रधारकांना घरे मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (२०-०६-२०२४) :** (१) हे खरे नाही.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सीटीएस नं.८२८(पै) व १५०४ अ(पै), सुभाष नगर, चेंबूर (पूर्व), या भूखंडावरील संजय नगर एस.आर.ए. सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.ही झोपडपट्टी पुनर्वसन योजना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत राबविण्यात येत आहे. सदर योजनेमध्ये १५५ झोपडीधारक असून इमारत क्र.१ मध्ये एकूण १३३ झोपडीधारकांना सदनिकांचे वाटप करण्यात आले असून सदर इमारतीस दि.१६.०२.२०२४ रोजी अंशत: भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे.

सदर योजनेचे विकासक यांनी उर्वरित १७ झोपडीधारकांना सन २०२६ पर्यंत आगाऊ भाड्याचा पुढील तारखेचा धनादेश वितरीत केल्याचे कळविले आहे. त्यामुळे सदर योजनेमध्ये भाडे थकित असल्याचे दिसून येत नाही.

सदर योजनेतील इमारत क्र.१ मध्ये एकूण १३३ झोपडीधारकांना सदनिकांचे वाटप करण्यात आले आहे. सदर योजनेतील संयुक्त इमारत क्र.३ ला दि.०७.०१.२०२० रोजी बांधकाम आराखडे मंजूर करण्यात आले असून जोत्यापर्यंतच्या बांधकामास दि.१६.०२.२०२२ रोजी परवानगी देण्यात आलेली आहे. उर्वरित पात्र झोपडीधारकांचे संयुक्त इमारत क्र.३ मध्ये पुनर्वसन प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर जिल्ह्यातील डहाणूच्या पश्चिम किनारपट्टीवरील गावांना पाणी पुरवठा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(१८) ७१६१७ (२०-११-२०२३). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील डहाणूच्या पश्चिम किनारपट्टीवरील २९ गावे तसेच खेडोपाड्यांना पुरेशा प्रमाणात पाणी पुरवठा करण्याच्या दृष्टीने शासनाने बाडापोखरण प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजनेंतर्गत गेल्या दहा वर्षात कोट्यवधी रुपये खर्च करुनही अधिकारी व ठेकेदारांच्या उदासीन धोरणामुळे आजतागायत ही पाणी पुरवठा योजना प्रलंबित असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, सदर योजनाही सन १९९६ साली जिल्हा परिषदेच्या अखत्यारित देण्यात आली असून सदरहू योजनेचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याने दररोज जलवाहिनी फुटुन लोकांना पाणी पुरवठा होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, उक्त ठेकेदाराने सन २०२२ साली योजनेचे काम अर्धवट सोडून दिले आहे, हे ही खरे आहे काय.

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले तद्नुसार उक्त योजनेचे निकृष्ट दर्जाचे व प्रलंबित ठेवण्यात आलेल्या संबंधीत ठेकेदारांवर कोणती कारवाई केली तसेच गावांना नियमित पाणी पुरवठा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (०५-०७-२०२४) :** (१) हे खरे नाही.

जल जीवन मिशन कार्यक्रमातंर्गत बडा पोखरण व २९ गावे (रेट्रोफिटींग) या नवीन प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजनेस दिनांक ०५.०९.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर योजनेचे कार्यारंभ आदेश दिनांक १२.१२.२०२२ रोजी देण्यात आले असून, योजनेची कामे प्रगतीपथावर आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) देखभाल दुरुस्तीच्या अभावाने निर्माण झालेल्या बाबी संदर्भात उपाययोजना करण्यासाठी तसेच वाढीव प्रतिदिन दरडोई ५५ लिटर प्रमाणे पाणी पुरवठा करण्यासाठी जल जीवन मिशन योजनेतंर्गत योजनेची रेट्रोफिटींगची कामे हाती घेण्यात आली आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर जिल्हा परिषदेच्या जलजीवन मिशन योजनेंतर्गत कामात झालेला गैरव्यव्हार**

**(१९) ७१६१८ (२०-११-२०२३). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा विभागामध्ये जलजीवन मिशन योजनेंतर्गत अनेक गैरप्रकार सुरु असून परवानाधारक ठेकेदार यांची आर्थिक क्षमता नसतानाही त्यांना कोट्यवधी रुपयांची कामे दिल्याची बाब माहे ऑक्टोबर,

२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पाणी पुरवठा विभागाने रुपये १२३ कोटी ३६ लाख इतक्या रकमेच्या काढलेल्या निविदांमध्ये अनियमितता असल्याने त्या रद्द करण्याची मागणी जिल्हा परिषद सभेसमोर करण्यात आली, हे ही खरे आहे,
(३) असल्यास, उक्त कामांमधील ३३ टक्के कामे ही स्थानिक सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना देणे अपेक्षित असून ३३ टक्के कामे मजूर कामगार सहकार संस्था यांना देणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त योजनेबाबत रुपये ३० लाख रकमेवरील कामांची स्वतंत्र निविदा काढणे आवश्यक असताना तसे न करता पाणीपुरवठा विभागाने त्यांच्या मर्जीतल्या ठेकेदारांना काम मिळावे म्हणून निविदेतील कामे अनुभवाची जाचक तांत्रिक अट टाकून ही निविदा काढल्याने ही कामे आरक्षण असलेल्या ठेकेदारांना घेता येत नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदरहू योजनेबाबतची कामे मर्जीतल्या ठेकेदारांना मिळावे यासाठी अधिकारी वर्ग अशा ठेकेदारांना झुकते माप देत आहेत, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुसार उक्त निविदांमध्ये अनियमितता करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर व ठेकेदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (०५-०७-२०२४) :** (१) हे खरे नाही.

सनदी लेखापाल यांचेकडील आर्थिक प्रमाणपत्र व आर्थिक क्षमता प्रमाणपत्र सादर केलेल्या कंत्राटदारांना ई निविदेअंती जल जीवन मिशन अंतर्गत मंजूर कामाकरिता पालघर जिल्हा परिषदेमार्फत निविदेस पात्र करण्यात आले आहे.
(२) दिनांक १५.१०.२०२३ रोजी झालेल्या जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेसमोर ग्रामीण पाणी पुरवठा विभागाने काढलेल्या निविदेबाबत चर्चा करण्यात आलेली आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) दिनांक ४.९.२०२० रोजीच्या शासन निर्णयानुसार राज्य पाणी व स्वच्छता मिशनच्या कार्यकारी समितीमार्फत पाणी पुरवठा योजनांच्या जलद अंमलबजावणीकरीता मध्यवर्ती निविदा प्रक्रीया राबवुन पॅनल तयार करणेबाबत उल्लेखित आहे. त्याच धर्तीवर पालघर जिल्हयातील नळ जोडणीच्या कामाची अंमलबजावणी जलद गतीने करण्याकरीता १५ लक्ष वरील ३१५ घरगुती नळ जोडणींच्या कामांची एकत्रित निविदा करुन १३ कंत्राटदारांना अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा ०.५% कमी दराने कार्यादेश निर्गमित करण्यात आले. तसेच, १५ लक्ष खालील ३३४ कामांना ग्रामपंचायतीमार्फत निविदा प्रक्रिया राबवून घरगुती नळ जोडणीच्या कामाचे कार्यादेश देण्यात आले आहेत.
(५) व (६) हे खरे नाही.

पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, पालघर ने काढलेली कार्यात्मक घरगुती नळ जोडणी करणे या कामांसाठी Empanelment करणे ही खुली निविदा प्रक्रिया असून पात्र कंत्राटदारांनी ई निविदेमार्फत शासनाच्या www.mahaetender.gov.in वर जाऊन सहभाग घेतलेला आहे.

---

**इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी वसतीगृहे आणि आधार योजनेची फाइल वित्त विभागाकडे प्रलंबित असल्याबाबत..**

**(२०) ७१६५२ (१३-०२-२०२४). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे (नांदगाव), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्री.चंद्रकांत (भाऊ)**

**निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.अनिल देशमुख (काटोल), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ३६ जिल्हयात ओबीसी विद्यार्थ्यांसाठी ३६ आणि विद्यार्थीनीसाठी ३६ अशी ७२ वसतिगृहे उभारण्याची ओबीसी कल्याण विभागाची योजना असल्याने याकरीता भाडेतत्वावर ही वसतीगृहे घेण्याचा निर्णय घेतला असून यासाठी ७३ कोटी रूपये मंजूर करण्यात आले तर या वसतीगृहात सोईसुविधासाठी ३९ कोटीची आवश्यकता असल्याने हीच महत्वाची नस्ती वित्त विभागाकडे गेल्या अनेक महिन्यापासून प्रलबित असल्याची बाब दिनांक १७ ऑक्टोबर २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसतिगृहे बाहय ओबीसी विद्यार्थ्यांसाठी आधार योजना प्रस्तावित असून त्या योजनेचा लाभ प्रत्येक जिल्हयात ६०० या प्रमाणे ३६ जिल्हयात २१ हजार ६०० विद्याार्थ्यांना लाभ दिला जाणार असल्याने ही योजना सुध्दा मंजूरी अभावी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली काय व चौकशीत काय आढळून आले, त्याअनुषंगाने शासनाने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे?

**श्री. अतुल सावे (२६-०६-२०२४) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) आदिवासी विकास विभागाची स्वयम योजना व सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वाधार योजनेच्या धर्तीवर इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती (इतर मागास बहुजन कल्याण विभागाकडून भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांकरीता निर्वाह भत्याची पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना कार्यान्वित असल्यामुळे सदर योजनेचा लाभ घेत असलेले /घेणारे भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजाचे विद्यार्थी वगळून) आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रति जिल्हा ६०० या प्रमाणे एकूण २१,६०० विद्यार्थ्यांकरिता ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना राबविण्यास विभागाच्या दि.१३.१२.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

(४)प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे जिल्ह्यातील अवैध दारू व्यवसायाबाबत

**(२१) ७१७३८ (१७-०२-२०२४). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यात हातभट्टीबरोबर परराज्यांतील दारूविक्रीला बंदी असताना अवैध दारूचा व्यवसाय सुरू असून या धंद्यांवर राज्य उत्पादन शुल्क विभागाने गत सहा महिन्या १५०१ केलेल्या कारवाऱ्यांमध्ये ५ कोटी २७ लाखांचा मुद्देमाल जप्त केला असून १ हजार १० जणांना अटक केल्याचे दिनांक १३ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागरिकांच्या जिवांशी खेळणाऱ्या या अवैद्य दारू विक्रेत्या विरोधात शासनाने कोणती कारवाई केली तसेच अवैध दारु विक्रीवर बंदी घालण्याच्यादृष्टीने नवीन कायदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंभूराज देसाई (२९-०६-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, ठाणे कार्यालयामार्फत ठाणे जिल्ह्यात दि.१ एप्रिल, २०२३ ते ३० सप्टेंबर, २०२३ या सहा महिन्याच्या कालावधीत अवैध मद्यविक्री, हातभट्टी निर्मिती, विक्री व वाहतूक करणा-या समाजकंटकावर एकूण १५०१ गुन्हे नोंदविले असून सदर गुन्ह्यात १०१५ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. सदर गुन्ह्यांमध्ये एकूण

रू.५,२७,४८,३५७/- इतक्या किंमतीचा मुद्देमाल जप्त केलेला आहे. याव्यतिरिक्त विभागीय भरारी पथक, कोकण विभाग, ठाणे तसेच राज्य स्तरीय भरारी पथक, मुंबई यांनी देखील स्वतंत्रपणे गुन्हे नोंदविलेले आहेत.

२ अवैध दारू विक्रेत्यांविरोधात कारवाईसाठी ठाणे जिल्ह्यातील कार्यकारी घटक, जिल्हा भरारी पथक तसेच विभागीय व राज्य स्तरीय भरारी पथके कार्यरत आहेत. सदर पथकांमार्फत सातत्याने अवैध मद्यावर कारवाई करण्यात येते. याशिवाय सराईत गुन्हेगारांवर खालीलप्रमाणे प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येत आहे.

१) दिनांक १ एप्रिल ते ३० सप्टेंबर, २०२३ या कालावधीत अवैध विक्री करणा-या १४४ सराईत गुन्हेगारांवर महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ मधील कलम ९३ नुसार कारवाई प्रस्तावित करण्यात आलेली आहे. त्यातील ७० प्रकरणांमध्ये एकूण रू.१५,३०,०००/- इतक्या रक्कमेचे चांगल्या वर्तणूकीचे बंधपत्र घेण्यात आलेले आहेत.

२) अवैध मद्यासंबंधीत गुन्हेगारांविरूध्द महाराष्ट्र झोपडपट्टी दादा, हातभट्टीवाले, औषधी द्रव्य विषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, दृकश्राव्य कलाकृतीचे विनापरवाना प्रदर्शन करणा-या व्यक्ती (व्हिडीओ पायरेटस्), वाळु तस्करी व अत्यावश्यक वस्तूंचा काळाबाजार करणा-या व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबतचा कायदा १९८१ (MPDA) खाली प्रतिबंधात्मक कारवाया करण्याबाबत प्रस्ताव दाखल करण्यात आलेले आहेत.

३) उक्त कालावधीत महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ मधील दाखल व प्रलंबित गुन्ह्याच्या अनुषंगाने मा.न्यायालयाने आयोजित लोक अदालतीमध्ये एकूण १२२ गुन्हे निकाली काढण्यात आले आहेत. मद्याची तस्करी करणे, अवैध मद्यनिर्मिती, वाहतूक व विक्री करणा-या एकूण १२२ गुन्ह्यांमध्ये एकूण १३७ आरोपींकडून मा.न्यायालयाच्या आदेशान्वये रू.३३,९१,०००/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर महापलिकेच्या अंबाझरी तलावाची भिंत धोकादायक असल्याबाबत

**(२२) ७१७४४ (०६-०२-२०२४). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेच्या अंबाझरी तलावाची भिंत धोकादायक झाली असून पडण्याच्या स्थितीत असल्याची माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर शहराजवळ असलेला अंबाझरी तलावाची भिंत पडल्यास नागपूर शहरात जिवित तथा वित्तहानी मोठ्या प्रमाणावर होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुसार उक्त तलावाच्या धोकादायक भिंतीमुळे होणारी जिवित तथा वित्तहानी टाळण्याकरीता कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०४-०७-२०२४) :** (१) हे खरे नाही.

(२) अंबाझरी तलावाच्या सांडव्याच्या भिंतीच्या मजबुतीकरणाचे काम नागपूर पाटबंधारे विभागाद्वारे पूर्ण करण्यात आलेले आहे.

(३) अंबाझरी धरणाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने रु. २१,०६,९२,४८२ किमतीच्या कामाकरीता स्थायी समिती ठराव क्र. ५३ दि. ०४.०१.२०२१ अन्वये मान्यता प्राप्त असून अंबाझरी धरणाचे मजबुतीकरण व बळकटीकरण करण्याचे काम ठेव तत्वावर नागपूर पाटबंधारे विभागाद्वारे प्रगतीपथावर आहे. त्याअंतर्गत पुढील कामे पूर्ण करण्यात आली आहेत.

१) जिर्ण सांडव्याच्या भिंतीच्या आतील भागातुन कॉक्रीट जॅकेटींगचे काम पुर्ण.

२) सांडव्याच्या खालील बाजुस RCC रिटेनिंग वॉलचे काम पुर्ण.

३) उर्जाव्यय रचना (EDA) व कट ऑफ वालचे काम पुर्ण.

मा. उच्च न्यायालयाच्या आदेशांच्या अनुषंगाने अंबाझरी धरणाच्या बळकटीकरणासाठी घेण्यात आलेली कामे तातडीने पूर्ण करण्याकरीता शासन निर्णय क्रमांकः नामपा- ३०२३/प्र.क्र.२६१/नवि-२६, दि. ५ जानेवारी २०२४ अन्वये विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती गठित करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिंधुदूर्ग जिल्ह्यात शेतकऱ्यांना निधी अभावी जमीन आरोग्य पत्रिका देण्यात न आल्याबाबत**

**(२३) ७२३८२ (१३-०२-२०२४). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधुदूर्ग जिल्ह्यात राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात ३,३६० जमीनींची आरोग्य पत्रिका तयार करण्याकरिता कृषी विभागाने २,०४५ शेतकऱ्यांच्या शेत जमिनीतील मातीचे नमुने घेतले असल्याचे दिनांक २९ जुलै, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यापैकी १,६६५ नमुने प्रयोगशाळेत पाठविले असता त्यातील २०० नमुन्याचीच तपासणी करण्यात आल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जमिनीच्या आरोग्य पत्रिका तयार करण्यासाठी निधीची आवश्यकता असून शासनामार्फत पाठपुरावा सुरु असल्याचे जिल्हा कृषी अधिक्षक, सिंधुदूर्ग यांचेकडून सांगण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार आवश्यक तो निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (०४-०७-२०२४) :** (१ ) खरे आहे.
(२) हे खरे आहे.
सन २०२३-२४ मध्ये प्रयोगशाळेसाठी ३५०० नमुने मार्च, २०२४ अखेर प्राप्त झाले असून संपूर्ण नमुन्यांची तपासणी पूर्ण करण्यात आली आहे व मृद आरोग्य पत्रिका वितरण सुरु आहे.
(३) हे खरे नाही.
जमिनीच्या आरोग्य पत्रिका तयार करण्यासाठी आवश्यकतेप्रमाणे निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.
(४) सन २०२३-२४ साठी योजने अंतर्गत सर्व जिल्ह्यांना रु.३.८३ कोटी निधी वितरीत करण्यात आला आहे. त्यापैकी सिंधुदूर्ग जिल्ह्याला योजनेचा रु.९,२९,८९९/- इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील भांडेवाडी येथील मृत जनावरांच्या विल्हेवाटीसाठी प्रस्तावित करण्यात आलेला इन्सिनेरेटर प्रकल्प पूर्ण करण्याबाबत**

**(२४) ७२७४० (११-०२-२०२४). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील भांडेवाडी येथे मृत जनावरांच्या विल्हेवाटी मंजूर करण्यात आलेला इन्सिनेरेटर प्रकल्प आजमितीस ६ वर्ष होऊनही पूर्णत्वास आला नसल्याची बाब दिनांक २१ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय;
(२) असल्यास, सदरहू प्रकल्पाचे बांधकाम प्रलंबित असल्याने नागपूर शहरातील मृत पाळीव तथा भटक्या जनावरांना जमीनीत पुरण्यात येत असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत आहे, हे ही खरे आहे काय;

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे आणि नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील भांडेवाडी येथील मृत जनावरांच्या विल्हेवाटीसाठी प्रस्तावित करण्यात आलेला इन्सिनेरेटर प्रकल्प तातडीने कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे;
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०४-०७-२०२४) :** (१) हे अंशतः खरे आहे.

स्वच्छ भारत अभियान (नागरी) १.० अंतर्गत नागपूर महानगरपालिके करीता घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पास रु.२८८.६८ कोटीस दि. १४.०५.२०२१ रोजी राज्य शासनाकडून मंजूरी देण्यात आली. यामध्ये Animal Crematorium या रू ९.०० कोटींच्या प्रकल्पाचा समावेश आहे. प्राप्त मंजूरीन्वये Animal Crematorium च्या कामाकरीता ई.पी.सी. तत्वावर बांधकाम व ५ वर्षाकरीता देखभाल व दुरुस्ती करण्याकरीता दि. ०३.०२.२०२३ ला निविदा प्रसिध्द करण्यात येवून निम्नतम निविदाकार मे. सिकॉन पोलुटेक सिस्टम प्रा. लि., लखनऊ यांचेशी दि. १२.०७.२०२३ ला करारनामा करण्यात येवून कार्यादेश देण्यात आलेला आहे. या कामाकरीता मौजा-भांडेवाडी येथील मनपाच्या मालकीची १८०० चौ.मी. जागा रेखांकीत करुन देण्यात आलेली आहे.
सद्यस्थितीत कंत्राटदाराद्वारे सदर प्रकल्पाचे कार्य प्रगतीपथावर आहे.
(२) हे खरे नाही.
सद्यस्थितीत भांडेवाडी, नागपूर येथे मनपाच्या मालकीच्या ॲनिमल स्लॉटर हाऊस व प्रक्रियेकरीता राखीव असलेल्या जागेमध्ये मृत जनावरांच्या विल्हेवाटीकरीता खोल दफन पध्दतीचा अवलंब करण्यात येत आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर शहरात अवैधरित्या पे अँड पार्क उभारुन वाहनचालकांची लूट सुरु असल्याबाबत

**(२५) ७२७५५ (१५-०२-२०२४). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर (जि.नागपूर) शहरातील दयानंद पार्क, गांधीबाग उद्यान आणि सिताबर्डी परिसरातील रस्त्यांवर अवैधरित्या पे अँड पार्क उभारून वाहनधारकांकडून वाहनांच्या पार्किंगसाठी शुल्क वसूल करून आर्थिक लूट सुरू असल्याची बाब दिनांक १२ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू ठिकाणी सुरू असलेल्या अवैध पे अँड पार्किंग संदर्भात कारवाई करण्याबाबत नागपूर महानगरपालिका प्रशासनाकडून हेतुपुरस्सर दुर्लक्ष करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने पे अँड पार्किंगच्या माध्यमातून वाहनचालकांची सुरू असलेली लूट थांबविण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०४-०७-२०२४) :** (१) नागपूर महानगरपालिकेच्या वाहतूक विभागातर्फे सिताबर्डी रोड व परिसरात कोणत्याही स्वरुपाची पे ॲन्ड पार्क व्यवस्था उभारण्यात आलेली नाही.
(२) हे खरे नाही.
(३) सिताबर्डी येथील सुपर मार्केट येथे स्कुटर सायकल पार्कींगची व्यवस्था दि. ०४ जानेवारी २०२३ पासुन नागपूर स्मार्ट ॲन्ड संस्टेनेबल सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशन लि. (NSSCDCL) द्वारे सनियंत्रीत केली जात आहे. तसेच नेताजी मार्केट सिताबर्डी परिसरातील पार्कीग स्टॅन्ड बाजार विभागातर्फे नियुक्त कंत्राटदाराकडुन संचालित होत असुन त्यांच्याशी केलेल्या करारनाम्यानुसार विहित दरानुसार पार्कीग शुल्क आकारणी करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील झोपडपट्ट्यांचा पुनर्विकासाच्या ७०० हून अधिक योजना प्रलंबित असल्याबाबत

**(२६) ७३०६७ (१३-०२-२०२४). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.संजय जगताप (पुरंदर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील हजारो कष्टकऱ्यांना हक्काचे पक्के घर मिळावे आणि झोपडी मध्ये वास्तव्यास असणाऱ्यांचा राहणीमानाचा दर्जा सुधारावा म्हणून झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या माध्यमातून विविध योजनांद्वारे पुनर्विकास प्रकल्प राबविले जातात मात्र यामध्ये मुंबईतील तब्बल ६०० योजना विविध कारणामुळे प्रलंबित असल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्प प्रलंबित असल्यामुळे शिबिरात अनेक वर्षापासून वास्तव्यास असणारे नागरिक यांना मूलभूत सेवा सुविधा आणि थकीत भाडे देण्यासाठी म्हाडा प्रशासनाने कोणती कार्यवाही केली आहे काय,

(३) असल्यास, विविध कारणांनी प्रलंबित ६०० योजनांचा तात्काळ आढावा घेऊन त्या योजना पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अतुल सावे (२०-०६-२०२४) :** (१) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे सन २०१४ पुर्वी स्वीकृत झालेल्या परंतु पुढे कोणत्याही परवानग्या प्राप्त न झाल्यामुळे रखडलेल्या व दफ्तरी दाखल केलेल्या ५१७ योजना व विविध कारणास्तव २१९ योजना रखडल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) झोपु प्राधिकरणामार्फत शिबिरात अनेक वर्षापासून वास्तव्यास असलेल्या नागरिकांना मुलभूत सुविधा देण्याच्या अनुषंगाने वारंवार सुचना देण्यात येत आहेत.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत परिपत्रक क्र.२१० अन्वये पुढील दोन वर्षाचे आगाऊ भाडे व त्यापुढील १ वर्षाचे पुढील तारखेचे धनादेश (PDC) जमा करुन घेऊन झोपडीधारकांना भाडे अदा करण्यात येते. विकासकाने थकीत घरभाडे भरल्याशिवाय कोणतीही नवीन बांधकाम परवानगी दिली जात नाही. तसेच यापूर्वी मंजूर झालेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील विकासकाकडून भाडे वसूल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) रखडलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजना मार्गी लावण्यासाठी शासनाने पुढील धोरणात्मक निर्णय घेतलेले आहेत :-

१) निविदा प्रक्रियेने विकासकाची नेमणूक करणे,

याअंतर्गत कलम १३ (२) नुसार आजपर्यंत ९० प्रकरणांमध्ये निर्णय घेण्यात आलेला असून त्यानुसार योजनेसाठी पुढील परवानग्या देण्यात येत आहेत. उर्वरित प्रकरणांमध्ये कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

२) अभय योजना राबविणे

याअंतर्गत १५ योजनांमध्ये कलम ३k अंतर्गत निदेश देण्यात आले असून अशा योजनांमध्ये वित्तीय संस्थांना सह-विकासक/ऋणदाता म्हणून मान्यता देऊन सुधारित आशयपत्र देण्यात येत आहेत.

३) मुंबई महानगर प्रदेशातील झोपडटपट्टी पुनर्वसन योजना संबंधित झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण व अन्य महामंडळे/प्राधिकरणे/स्थानिक राज्य संस्था यांच्या संयुक्त भागीदारीत (Joint Venture) राबविणे.

याअंतर्गत रमाबाई आंबेडकर नगर, घाटकोपर येथील १६००० झोपडीधारकांसाठी झोपडपट्टी पुनर्वसन योजना MMRDA व SRA यांच्या संयुक्त भागीदारीत राबविण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### खामगांव या तालुक्यातील लघु पाटबंधारे विभागांतर्गत असणाऱ्या कालव्यांची दुरुस्ती करण्याबाबत

**(२७) ७३१७६ (१७-०२-२०२४). अ‍ॅड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील खामगांव पाटबंधारे विभागांतर्गत पिंप्री गवळी, टाकळी, गारडगांव, गणेशपूर, हिवरखेड १ व हिवरखेड ३ या लघु पाटबंधारे योजना कालव्यांची मोठया प्रमाणात दुरावस्था झाली असून कालव्यांमध्ये मोठ मोठी झाडे वाढली असल्याने तसेच कालवा ठिकठिकाणी फुटलेला असल्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतीपर्यंत पाणी पोहचत नसून पाण्याची मोठया प्रमाणात नासाडी होते, हे खरे आहे काय,

(२) तसेच मन प्रकल्प, तोरणा प्रकल्प, मस प्रकल्प व ढोरपगांव लघु सिंचन प्रकल्प कार्यान्वीत असून सदरहु प्रकल्प फार जुने, तसेच संबंधीत प्रकल्पाचे धरण, कालवे व सिंचन वितरण प्रणाली अनेक ठिकाणी मृत अवस्थेत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न उक्त कालवा दुरुस्तीची कामे जिल्हा नियोजन समिती कालवा दुरुस्ती व देखरेख व लघु पाटबंधारे योजना व दुरुस्ती १०१ ते २५० शिर्षकांतर्गत मंजुरी देण्याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक २४ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास पालकमंत्री बुलढाणा यांच्याकडे मागणी केली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चैकशी करुन मधील कालवे व सिंचन वितरण प्रणालीची दुरुस्ती करणे आवश्यक्र असल्याने संबंधीत प्रकल्पांच्या धरण व कालवे यांची विशेष दुरुस्ती करण्याकरीता निधी उपलब्ध करुन दुरुस्तीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (०९-०७-२०२४) :** (१) होय. हे खरे आहे.

(२) होय. हे खरे आहे.

(३) होय. हे खरे आहे.

(४) जलसंपदा विभागाकडून प्राप्त माहितीनुसार प्रकल्पांच्या वितरण प्रणालीची नियमित देखभाल दुरुस्तीची कामे पाखरण कार्यक्रमांतर्गत जलसंपदा विभागाच्या यांत्रिकी संघटनेमार्फत तसेच बिगर सिंचन प्रापणसुची अंतर्गत उपलब्ध निधीतुन करण्यात येते.

मन मध्यम प्रकल्पाच्या धरण सुरक्षिततेची कामे जिगाव प्रकल्प पाटबंधारे मंडळ, शेगाव यांच्यामार्फत प्रगतीपथावर आहे.

मन मध्यम प्रकल्प, तोरणा मध्यम प्रकल्प व मस मध्यम प्रकल्पांच्या कालव्यांची विशेष दुरुसतीची कामे सन २०२१-२२ च्या बिगर सिंचन प्रापणसुची अंतर्गत उपलब्ध निधीमधून करण्यात येत आहे.

ढोपरगाव ल.पा.प्रकल्पाची नियमित देखभाल दुरुस्तीची कामे बिगर सिंचन प्रापणसुची सन २०२३-२४ अंतर्गत प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### दक्षिण सोलापूर येथील कामांना जलसंधारण महामंडळाकडून प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत

**(२८) ७३५०४ (१९-०२-२०२४). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण सोलापूर येथील कामांना जलसंधारण महामंडळाकडून प्रशासकीय मान्यता मिळण्यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.उपमुख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्री महोदयांना माहे सप्टेंबर, २०२३ च्या दुस-या आठवड्यात वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दक्षिण सोलापूर सिमावर्ती भाग व उत्तर सोलापूरातील काही भाग हा असिंचित असल्याने सन २०१४ पासून जलसंधारण विभागाने येथील कोणतेही काम मंजूर न केल्याने या भागातील वाढणारा अनुशेष दूर व्हावा म्हणून सुचविण्यात आलेल्या कामांना गरज असतानाही तातडीने प्रशासकीय मंजूरी न दिल्याने येथील शेतकरी पाण्यावाचून वंचित रहात असल्याने त्यांना शेती करणे अत्यंत गैरसोयीचे होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने सदर कामांना तातडीने प्रशासकीय मान्यता देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. संजय राठोड (२८-०६-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही,

जलसंधारण महामंडळ निधी अंतर्गत दक्षिण सोलापूर तालुक्यामध्ये ५ व उत्तर सोलापूर तालुक्यामध्ये ५ अशी एकूण १० कामे सन २०२२ मध्ये पूर्ण करण्यात आली आहेत. सदर कामांमुळे ४४७ स.घ.मी. साठवण क्षमता व १२४ हे.सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. उत्तर सोलापूर तालुक्यातील सन २०१९-२०२२ या कालावधीत प्र.मा. प्राप्त ५ कामे प्रगतीपथावर असून सदर कामांमुळे १२३३ स.घ.मी. पाणीसाठा व २६७ हे. सिंचन क्षमता पुनर्स्थापित होणार आहे. सन २०१२ व सन २०२२ मध्ये प्र.मा. प्राप्त ७ कामांमुळे ७४२ स.घ.मी. पाणीसाठा व १३७ हे. सिंचन क्षमता नव्याने निर्माण होणार आहे. तसेच ३ कामांमुळे १७७९ स.घ.मी. पाणीसाठा व ४१२ हे सिंचन क्षमता पुनर्स्थापित होणार आहे.
(३) मा. लोकप्रतिनिधी यांनी सुचविण्यात आलेली उत्तर सोलापूर मधील १ व दक्षिण सोलापूर मधील ९ अशी एकूण १० कामे अप्पर आयुक्त जलसंधारण तथा मुख्य अभियंता, प्रादेशिक परिक्षेत्र पुणे यांचेमार्फत दि. १०.०८.२०२३ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, छत्रपती संभाजीनगर यांचेकडे प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यात आले आहे. तसेच दक्षिण सोलापूर तालुक्यातील १ काम व इतर लोकप्रतिनिधींनी सुचविण्यात आलेली उत्तर सोलापूर तालुक्यामधील २ कामे व दक्षिण सोलापूर तालुक्यामधील ६ अंदाजपत्रके मंजूरीसाठी प्रस्तावित आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बृहन्मुंबई महानगर क्षेत्रातील बांधकाम व्यावसायिक आणि विकासकांच्या प्रकरणात निर्धारण अधिकाऱ्यांनी जमीनीच्या सतत्या न पडताळता मान्यता दिल्याबाबत

**(२९) ७३६८५ (१५-०२-२०२४). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगर क्षेत्रातील १४ बांधकाम व्यावसायिक आणि विकासकांच्या प्रकरणात निर्धारण अधिकाऱ्यांनी जमीनीच्या किंमतीवर रु.७७.५९ कोटी वजावट कागदपत्राची छाननी न करता व दस्ताऐवज उपलब्ध नसतांना सतत्या न पडताळता निर्धारण अधिकाऱ्यांनी मान्य केल्याचे भारताचे नियंत्रक व लेखापरिक्षण यांच्या माहे मार्च, २०१८ च्या अहवालातून निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जमीनीच्या किंमतीवर सन २००८-२००९ दरम्यान रु.१५.०९ कोटी आणि २००९-२०१० या कालावधीत रु.६.७७ कोटी अशी दोनदा वजाती मान्य केली होती, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यामुळे शासनाचा महसूल १५.४७ लाख कमी झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (२९-०६-२०२४) :** (१) भारताचे महानियंत्रक व लेखापरीक्षक यांनी खालीलप्रमाणे आक्षेप नोंदविला आहे. "१४ बांधकाम व्यावसायिकांच्या प्रकरणात निर्धारणा अधिकाऱ्यांनी जमिनीच्या किंमतीच्या रु.७७.५९ कोटी ची वजावट स्वरुपात दिली. निर्धारणा अधिकाऱ्यांनी सदर वजावट याबाबत अभिलेखावर माहिती ठेवली नाही"

(२) हे अंशत: खरे आहे, चुकीच्या दिलेल्या वजावटीबाबत वर्ष २००८-०९ व वर्ष २००९-१० करिता चूक दुरुस्ती आदेश दि.१४.११.२०१८ रोजी पारित करण्यात आले. त्यानुसार अनुक्रमे रु.२,११,९६,६०७ व रु.८७,६०,८७५ इतकी ज्यादा मागणी काढण्यात आली. सुधारित चूक दुरुस्ती आदेशात चुकीने मंजूर केलेली जमिनीची वजावट अमान्य करण्यात आली. व्यापाऱ्याने चूक दुरुस्ती आदेशाविरुध्द अपील दाखल केले होते.

अपिल निकाली काढण्यात येऊन सदर सुधारित चूक दुरुस्ती आदेश रद्दबातल करण्यात आला, आणि मूळ आदेशानुसार मागणी कायम करण्यात आली. (जमिनीची वजावट मान्य करण्यात आली) थकबाकी काहीही नाही.

(३) हे खरे नाही.

(४) सदर प्रकरणांत शासकीय चौकशीचा प्रश्नच उद्भवत नाही. तथापि सदर प्रकरणांत खात्री करण्यासाठी फेरपडताळणी करण्यात आली आहे. सर्व प्रकरणात विभागाने फेरपडताळणी केली, त्यानुसासर एकूण १४ प्रकरणांपैकी पडताळणीनुसार, ७ प्रकरणात असे निदर्शनास आले की, मान्य केलेला जमिनीच्या किंमतीचा दिलेला वजावटीचा दावा योग्य आहे. ४ प्रकरणात अपिलामध्ये दावा मान्य करण्यात आला आहे. २ प्रकरणात सुधारित कार्यवाही पूर्ण करण्यात आली असून, अतिरिक्त मागणी केलेली रक्कम व्यापाऱ्याने भरलेली आहे. १ प्रकरणात सुधारीत कार्यवाही पूर्ण करण्यात आली असून, अतिरिक्त मागणी केलेली रक्कम व्यापाऱ्याने अभय योजना २०२२ चा लाभ घेऊन भरलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कांदिवली पूर्व येथे रिक्षाचालक अवैध प्रवासी वाहतूक करत असल्याबाबत

**(३०) ७३८३५ (०८-०२-२०२४). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कांदिवली पूर्व येथे रिक्षाचालक अवैध प्रवासी वाहतूक करीत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्षाचालक वाहतुकीचे नियम मोडून रेल्वे स्थानकाजवळ रिक्षा पार्किंग करत असूनही रिक्षाचालकांवर कोणतीही कारवाई होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या रिक्षाचालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०७-२०२४) :** (१) व (२) प्रादेशिक परिवहन कार्यालय मुंबई (पश्चिम) व उप प्रादेशिक परिवहन कार्यालय बोरीवली कार्यालयातील वायूवेग पथकांद्वारे अवैध प्रवासी वाहतूक करणा-या ऑटोरिक्षा यांच्यावर मोटार वाहन कायदयातंर्गत नियमितपणे कारवाई करण्यात येते.

एप्रिल, २०२३ ते जानेवारी,२०२४ या कालावधीत जादा प्रवासी वाहतूक करणाऱ्या १७२ व विना परवाना वाहतूक करणाऱ्या २५२ वाहनांवर कारवाई करुन रु.२२.१७ लक्ष इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

तसेच वाहतूकीचे नियम मोडून वाहन पार्किंग करणाऱ्या दोषी ११४ ऑटोरिक्षावर कारवाई करण्यात आली असून रु.३७ हजार इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

(३) प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (पश्चिम) व उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, बोरीवली यांच्या वायुवेग पथकामार्फत रस्त्यावर धावणाऱ्या व योग्यता प्रमाणपत्राची मुदत संपलेल्या टॅक्सीवर पुढीलप्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे.

कार्यालयाचे नाव तपास-लेली वाहने दोषी वाहने परवाना निलंबन अनुज्ञप्ती निलंबन दंड वसूली (लक्ष) रू.
प्रापका मुंबई (पश्चिम) ३९७० १६९७ ११५ ४३६ ३१.३५
उप प्रापका बोरीवली २११३ ८५७ ८० १३१ ११.७७
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परराज्यातून नवी मुंबई, मुंबईत येणाऱ्या १८ ट्रॅव्हल्सची नोंदणी बोगस असल्याबाबत**

**(३१) ७३८८५ (०८-०२-२०२४). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परराज्यातून नवी मुंबई, मुंबईत येणाऱ्या ट्रॅव्हल्स बसची तपासणी नवी मुंबई आरटीओ मोहीम सुरु केली असून या मोहिमेत १७५ ट्रॅव्हल्सची तपासणी करण्यात आली असून १८ ट्रॅव्हल्सची नोंदणी बोगस असल्याचे दिनांक २१ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी कोणता गुन्हा दाखल करण्यात आला आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने ट्रॅव्हल्सची नोंदणी बोगस असणाऱ्या संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०७-२०२४) :** (१), (२) व (३) नवी मुंबई,मुंबईत येणाऱ्या ट्रॅव्हल्स बसची तपासणी उप प्रादेशिक परिवहन कार्यालय,नवी मुंबई यांनी मोहीम सुरु केली होती.या मोहीमेत १७५ ट्रॅव्हल्सची तपासणी करण्यात आली असून ११ ट्रॅव्हल्सची नोंदणी बोगस असल्याचे दिसून आले आहे.

यावाबत भा.द.वि.सं. कलम ४२०, ४६५, ४६६, ४६७, ४६८, ४७१, १२० (ब) अन्वये सानपाडा पोलीस स्टेशन येथे गुन्हे रजि.क्र.१३१/२०२३, दि.२१.०८.२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयामध्ये ४ आरोपींना अटक करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**प्रधानमंत्री कृषी सिंचन व बळीराजा जलसंजीवनी प्रलंबित असल्याबाबत.**

**(३२) ७३९४३ (१७-०२-२०२४). श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अतिशय कमी पाऊस असणा-या दुष्काळी भागातील शेतकऱ्यांसाठी ‘प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना’ आणि ‘बळीराजा जलसंजीवनी’ या केंद्र अर्थसहाय्यित योजना राबविल्या जात आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दुष्काळी भागासहीत इतर ठिकाणच्या सिंचन प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता न मिळाल्याने ते प्रकल्प प्रलंबित असल्याने शेतकरी सदर योजनेच्या लाभापासून वंचित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रलंबित असलेल्या सिंचन योजनांची क्षमता वाढविण्यासाठी असणा-या प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना’ आणि ‘बळीराजा जलसंजीवनी’ या योजनांची कामे त्वरित पूर्ण करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०७-२०२४) :**
(१) होय. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना (PMKSY) अंतर्गत २८ प्रकल्प समाविष्ट असून त्यापैकी १५ प्रकल्प पुर्ण झाले आहेत. १३ प्रकल्पांचे काम प्रगतीत आहे. २८ प्रकल्पांतून ५.४३ लक्ष हे. इतकी अंतिम सिंचन क्षमता निर्मित होणे अपेक्षित आहे, त्यापैकी ३.७७ लक्ष हे. सिंचन क्षमता निर्माण करण्यात आली आहे.
बळीराजा जलसंजीवनी (BJSY) योजनेअंतर्गत विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त व आत्महत्याग्रस्त जिल्ह्यातील ९१ प्रकल्प असून त्यापैकी ५३ प्रकल्प पूर्णत्वास आलेले आहेत. ९१ प्रकल्पांतून ३.७६ लक्ष हे. इतकी अंतिम सिंचन क्षमता निर्मित होणे अपेक्षित आहे, त्यापैकी १.६९ लक्ष हेक्टर सिंचन क्षमता निर्माण करण्यात आली आहे.
(२) होय. अंशत: खरे आहे.
(३) १) प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना (PMKSY) व बळीराजा जलसंजिवनी योजना (BJSY) या योजनेंतर्गत असलेल्या प्रकल्पांची कामे त्वरित पुर्ण करण्यासाठी विशेष प्रकल्प कक्ष स्थापन करण्यात आला आहे.
२) बळीराजा जलसंजीवनी योजनेंतर्गत असलेल्या प्रकल्पांकरीता Baliraja monitoring unit (BMU) नावाचा नवीन कक्ष सुरु करण्यात आला आहे. सदर
कक्षाद्वारे प्रकल्पांच्या प्रगतीचा प्रत्येक आठवड्याला आढावा घेण्यात येतो.
३) PMKSY व BJSY मधील प्रकल्पांना सर्वोच्च प्राधान्य देऊन, प्रकल्पाच्या कामांच्या गतीत सुधारणा करण्यासाठी प्रकल्पाचे गांभीर्याने लक्ष देऊन योग्य नियोजन करण्याच्या दृष्टीने मा.अ.मु.स.(जलसंपदा) यांचे स्तरावर तसेच सचिव, केंद्रीय जलशक्ती मंत्रालय स्तरावर वारंवार बैठका घेऊन आढावा घेण्यात येतो.
४) प्रगती/PMG पोर्टलवरील प्रकल्पांच्या प्रगतीतील अडथळयांवर उपाययोजना करण्यासाठी प्रगती/PMG पोर्टलसंदर्भात वारंवार बैठका घेण्यात येतात व प्रकल्पांची सद्य:स्थिती पोर्टलवर अद्ययावत करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही

---

## निफाड( जि. नाशिक) तालुक्यातील बंधाऱ्यांच्या दुरुस्तीबाबत

**(३३) ७४७१८ (१४-०२-२०२४). श्री.दिलीपराव बनकर (निफाड) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) निफाड, (जि. नाशिक) तालुक्यातील जुन्या बंधाऱ्यांची दुरुस्ती करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी तत्कालीन जलसंधारण मंत्री यांचेकडे दिनांक ३० जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार जवळपास ८० बंधाऱ्यांची कामे शासनाकडे मंजुरी अभावी प्रस्तावित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरच्या कामांना अद्यापही शासनाने मंजुरी प्रदान केलेली नसल्याने यांची कारणे काय आहेत तसेच मंजुरी प्रदान करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. संजय राठोड (०४-०७-२०२४) :** (१) होय. हे खरे आहे.
(२) होय. हे खरे आहे.
(३) मा.विधानसभा सदस्य यांनी मागणी केलेले ७७ बंधारे हे निफाड येथील स्थानिक साखर कारखाना यांनी ३०-४० वर्षापुर्वी पुर्ण केलेली असून सर्व कामे जिल्हा परिषद ल.पा. यांच्याकडे हस्तांतरीत केलेली आहेत. सदर ७७ बंधाऱ्यांपैकी ८ बंधारे दुरुस्ती कामांना मुख्यमंत्री जलसंवर्धन योजनेतंर्गत प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे व कामे पुर्ण करण्यात आलेली आहे. १० बंधारे दुरुस्ती कामांना महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाकडून प्रशासकीय मान्यता प्राप्त असून सदर योजनांची निविदा कार्यवाही प्रगतीत आहे. १७ बंधारे दुरुस्ती अंदाजपत्रके प्रशासकीय मान्यतेस्तव शासन स्तरावर प्रस्तावित

आहेत. जिल्हा परिषद नाशिक यांचेमार्फत २० बंधाऱ्यांची दुरुस्ती पुर्ण करण्यात आलेली असून उर्वरित २२ कामांबाबत कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हेवाडी ( ता. केज, जि. बीड) येथील साठवण तलावास पाणी उपलब्ध करून देण्याबाबत**

**(३४) ७४७५३ (०८-०२-२०२४). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हेवाडी ( ता. केज, जि. बीड) येथील साठवण तलावाचे पाणी उपलब्धता प्रस्ताव सन २०१२ मध्ये पाणी उपलब्धता प्रमाणपत्र न मिळाल्याने प्रशासकीय मंजुरी देण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर साठवण तलाव सिंदफणा उपखोऱ्यात येत असून सदर खोऱ्यातील मंजूर चोरांबा साठवण तलाव शेतकऱ्यांच्या विरोधामुळे रद्द करण्यात आलेला आहे. हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चोरांबा साठवण तलावासाठी उपलब्ध असलेले पाणी प्रस्तावित कोल्हेवाडी साठवण तलावासाठी देण्याबाबत अप्पर आयुक्त जलसंधारण प्रादेशिक क्षेत्र, पुणे यांना निर्णय घेण्याची तरतूद आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सिंदफणा उपखोऱ्यातील रद्द झालेल्या चोरांबा साठवण तलावाचे उपलब्ध असलेले पाणी कोल्हेवाडी, साठवण तलावासाठी उपलब्ध करून देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जलसंपदा मंत्री यांच्याकडे दिनांक १ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे. हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत?

**श्री. संजय राठोड (०२-०७-२०२४) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे
(४) होय, हे खरे आहे.
(५) चोरंबा साठवण तलावास मंजूर असलेले पाणी त्याच उपखो-यातील प्रस्तावित कोल्हेवाडी साठवण तलाव ता.केज, जि. बीड योजनेस वापरण्याबाबत / पाणी वळण प्रस्तावाची कार्यवाही मृद व जलसंधारण विभाग, बीड मार्फत हाती घेण्यात आली असून योजनेची व्यवहार्यता तपासून प्रस्तावित योजनेचा पाणी वापराचा /वळतीचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात येईल.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शामगाव (ता.कराड, जि. सातारा) या गावातील ग्रामस्थांना शेतीसाठी पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(३५) ७४८६९ (१४-०२-२०२४). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शामगाव (ता.कराड, जि. सातारा) या गावात शेतीकरिता लागणा-या पाण्यासाठी शाळगाव-बोंबाळवाडी ते शामगाव तलावात टेंभू योजनेतून पाणी सोडण्याचा अंदाजे खर्च ५० कोटी रुपये इतका आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कराड तालुक्यातील टेंभू उपसा सिंचन योजना कार्यान्वित होऊन कराड तालुक्यातील शामगाव परिसरात अजूनही पाणी न मिळाल्याने तेथील शेतकरी दिनांक १ नोव्हेंबर, २०२३ रोजी वा त्यासूमारास उपोषणाला बसणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच यापूर्वीही सन २०१९ मध्ये शामगावच्या लोकांनी पाणी प्रश्नासाठी तहसिलदार कार्यालयावर मोर्चा काढला होता, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदर ग्रामस्थाना पाणी मिळण्यासाठी कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०७-२०२४) :** (१) होय, अंशतः खरे आहे.

मौजे शामगाव, ता.कराड, जि. सातारा येथील तलावात टेंभू उपसा सिंचन योजनेतून पाणी सोडण्याबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने क्षेत्रीय स्तरावर प्राथमिक सर्वेक्षण करण्यात आले असून त्यानुसार योजनेचा अंदाजे खर्च रु.२५.५३ कोटी इतका आहे.

(२), (३) व (४) होय,

टेंभू प्रकल्पाच्या लाभक्षेत्राबाहेरील शामगांव येथील वंचित क्षेत्राचा समावेश करणे ही बाब धोरणात्मक असल्याने याबाबतचा सविस्तर प्रस्ताव महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांच्याकडून शासनास प्राप्त असून, सदर प्रकरणी शासनस्तरावर कार्यवाही प्रगतीत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### गिरणी कामगारांना घरे मिळण्यासाठी कामगारांची पात्रता निश्चित करण्याबाबत

**(३६) ७५२०६ (१३-०२-२०२४). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहराच्या जडणघडणीमध्ये महत्त्वाचा वाटा असलेल्या गिरणी कामगारांना घरे देण्यासाठी पात्रता निश्चित करण्यासाठी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २१ सप्टेंबर २०२३ रोजी संपन्न झालेल्या बैठकीमध्ये तीन महिन्यांमध्ये पात्रता निश्चित करण्यात साठी मोहीम राबवण्याची प्रक्रिया मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांच्यामार्फत सुरू आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन १९८२पासून पुढे तीन वर्षांमध्ये २४०दिवस भरलेला गिरणी कामगारांच्या पात्रता निश्चित मोहिमेमध्ये अर्ज भरण्याकरिता शासन नियमानुसार पात्र करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(३) तसेच संपाच्या पूर्वी काम करत असलेल्या गिरणी कामगारांनाही पात्रता निश्चित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अतुल सावे (२७-०६-२०२४) :** (१)मा. मुख्यमंत्री, महोदयांनी गिरणी कामगारांना सदनिका वाटपाबाबत दिनांक २१/०८/२०२३ रोजी आयोजित केलेल्या आढावा बैठकीमध्ये अद्याप घरे न मिळालेल्या १,५०,४८४ गिरणी कामगारांची/त्यांच्या वारासांची सोडत काढण्यापूर्वीच पात्रता निश्चिती करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

(२) गिरणी कामगारांची पात्रता खालील निकषांच्या आधारे तपासण्यात येत आहे:-

१. दिनांक ०१.०१.१९८२ रोजी वा त्यानंतर गिरणीमध्ये कार्यरत असणे.

२. संपूर्ण सेवेमध्ये (सन १९८२ पुर्वी वा तद्‌नंतर) कोणत्याही वर्षात सलग २४० दिवस काम केलेले असणे.

(३) गिरणी कामगारांच्या घरांकरिता पात्रतेची दिनांक ०१.०१.१९८२ ही कट ऑफ डेट निश्चित करण्यात आली असून, त्यानुसार कामगारांची पात्रता तपासणीबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सिंधुदुर्ग जिल्ह्यात अवैध दारु वाहतूक व विक्रीचे प्रमाण वाढत असल्याबाबत

**(३७) ७५२२७ (२१-०२-२०२४). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

वि.स. २५७ (28)

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यात अवैध दारु वाहतूक व विक्रीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्याची बाब नुकतीच निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गत आठ महिन्यात जिल्हा राज्य उत्पादन शुल्क विभागाने अवैध दारु वाहतूकीप्रकरणी ६४५ आरोपींना अटक करुन त्यांच्याकडून ७ कोटी ४७ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्ह्यातील अवैध दारु वाहतूक व विक्रीला कायमस्वरुपी आळा घालण्यासाठी शासनाने कोणती सक्षम उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंभूराज देसाई (०१-०७-२०२४) :** (१) नाही, हे खरे नाही.

सन २०२०-२१ पासून सिंधुदुर्ग जिल्ह्यात नोंदविलेल्या गुन्ह्यांची आकडेवारी पाहता गुन्ह्यांच्या संख्येत घट झालेली आहे.

**वर्ष गुन्हे वारस गुन्हे अटक आरोपी एकूण जप्त मुद्देमाल (रू.)**
२०२०-२१ ९०४ ५०० ५२९ ३९२५८४८२
२०२१-२२ ७४१ ५८२ ५६७ १५२९१९९४१
२०२२-२३ ७२३ ७०७ ६७१ ११३०४४०४७
२०२३-२४
(२०.३.२०२४ पर्यंत) ६६५ ६३९ ६२९ ११०६४५५३५
(२) अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सिंधुदुर्ग यांच्या अखत्यारीत विविध कार्यालयांनी दि. १ एप्रिल, २०२३ ते दि.२९ फेब्रुवारी, २०२४ पर्यंत एकूण ६३८ गुन्हे नोंद करून रू.१०,१८,५८,३८५/- किंमतीचा मुद्देमाल जप्त केलेला आहे. यामध्ये ६०२ आरोपींना अटक करून ९४ वाहने जप्त केली आहेत.
(३) **(अ)** अवैध दारूच्या वाहतूक व विक्रीवर प्रभावी नियंत्रण ठेवून त्यावर पायबंद घालण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून दक्षता घेतली जात असून सातत्याने कारवाया करण्यात येतात. सिंधुदुर्ग जिल्हा गोवा राज्यास लागून असल्याने व गोवा राज्यात मद्यावरील उत्पादन शुल्क व मुल्यावर्धीत कराचा दर महाराष्ट्र राज्याच्या तुलनेत कमी असल्याने तेथील मद्याचे दर स्वस्त आहेत. परिणामी गोव्यातून महाराष्ट्रात अनधिकृतरित्या मद्याची आवक होण्याची शक्यता विचारात घेऊन प्रमुख मार्गावर इन्सुली येथे विभागाने कायमस्वरूपी सीमा तपासणी नाका कार्यान्वीत केला आहे. तर सातार्डा, किरणपाणी व कानूरफाटा (आंबोली) या ठिकाणी तात्पुरते सीमा तपासणी नाके उभारण्यात आले आहेत. त्याव्यतिरिक्त नियमित कार्यकारी अधिकारी, भरारी पथकाचे अधिकारी अनधिकृत मद्याची आवक, वाहतूक व विक्री होऊ नये म्हणून कार्यरत आहेत.
**(ब)** अवैध मद्य निर्मिती, विक्री व वाहतूक या संदर्भात राज्यातील नागरीकांना तक्रार करण्यासाठी टोल फ्री क्रमांक १८००२३३९९९९ उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. याखेरीज व्हॉट्सॲपद्वारे तक्रार करता यावी याकरीता व्हॉट्सॲप क्र.८४२२००११३३ उपलब्ध करून दिलेला आहे.
**(क)** आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क कार्यालयात २४X७ (अहोरात्र) नियंत्रण कक्ष कार्यरत असून तक्रारी निवारण प्रणाली सुविधा पोर्टलद्वारे प्राप्त तक्रारी थेट संबंधित जिल्हा अधीक्षकांना चौकशीकरीता पाठवून कारवाई करण्यात येते.
**(ड)** राज्य उत्पादन शुल्क विभागाशी संबंधित गुन्हे उघडकीस आणण्यासाठी गुप्त माहिती देणा-या खब-यांना त्याचप्रमाणे राज्य उत्पादन शुल्क विभागातील अधिकारी व कर्मचारी यांना गुन्हा अन्वेषण कामी प्रोत्साहन मिळावे म्हणून बक्षिस योजनेअंतर्गत बक्षिसाची रक्कम मंजूर करण्यात येते.
**(४)** प्रश्न उद्भवत नाही.

**छत्रपती संभाजी नगर येथील सहाय्यक पोलीस आयुक्त यांचे निलंबन रदद करण्यात आल्याबाबत**

**(३८) ७५२३२ (१४-०२-२०२४). श्री.शिरीष चौधरी (रावेर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर येथे नारळी बागेत एका विवाहीतेच्या घरात घुसून तिचा विनयभंग करण्यात आलेल्या सहाय्यक पोलीस आयुक्त यांना निलंबीत करण्यात आले होते परंतु ८ महिन्यानंतर त्यांचे निलंबन रदद करण्यात आले असल्याचे माहे सप्टेंबर २०२३ च्या पहिल्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरेआहे काय

(२)असल्यास, राज्य गृह विभागाच्या अपर मुख्य सचिवांच्या समितीने हा निर्णय घेतला असून त्यांना शासन सेवेत पुन्हा घेण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत सदर प्रकरणी अधिकाऱ्याचे निलंबन मागे घेण्याची कारणे काय आहेत, तसेच अधिकाऱ्यांचे निलंबन पुढे कायम ठेवण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०७-२०२४) :** (१), (२) व (३) I. सर्वोच्च न्यायालयाच्या श्री. अजयकुमार चौधरी विरुद्ध युनियन ऑफ इंडिया (सिव्हील अपिल क्रमांक १९१२/२०१५) मधील आदेशानुसार निलंबनापासून ३ महिन्याच्या कालावधीत निलंबनाचा आढावा घेणे आवश्यक आहे.

II. सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १४.१०.२०११, दिनांक ३१.०१.२०१५ व ०९.०७.२०१९ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार, सदर प्रकरणी निलंबनाचा आढावा घेऊन सहायक पोलीस आयुक्त (निलंबित), छत्रपती संभाजीनगर शहर यांना सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने दिनांक ३०.०८.२०२३ रोजीच्या शासन आदेशान्वये शासन सेवेत पुनःस्थापित करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भांडूप (पश्चिम) विधानसभा क्षेत्रात आंतरवासीय दाखला मिळण्याकरीता विभाग स्तरावर कार्यालय सुरु करण्याबाबत**

**(३९) ७५३५४ (२९-०२-२०२४). श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भांडूप (पश्चिम) विधानसभा क्षेत्रातील नागरिकांना शासनाच्या विविध योजनांतर्गत अनुदान मिळण्यासाठी आवश्यक असलेला आंतरवासीय दाखला घेण्याकरीता चेंबूर, मुंबई येथे असलेल्या महिला व बाल विकास कार्यालयात जावे लागत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यात वयोवृध्द नागरीक, महिला, अपंग व्यक्तिंना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याने सदरचा दाखला मिळण्याकरीता विभाग स्तरावर कार्यालय सुरु करण्यात यावे अशी मागणी दिनांक ५ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांचेकडे मागणी करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (०९-०७-२०२४) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३ )विभागीय उपायुक्त महिला व बाल विकास कोकण विभाग, चेंबूर, मुंबई यांनी दि.२२ मे, २०२४ च्या आदेशान्वये एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी नागरी मुलुंड(पश्चिम) यांना आंतरवासी नसल्याचा दाखला मिळण्याबाबत नागरिकांचे अर्ज स्विकारुन आठवड्याच्या दर सोमवारी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय मुंबई उपनगर चेंबुर या कार्यालयास सादर करावे. तसेच पात्र लाभार्थ्यांचे दाखले जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी नागरी मुलुंड कार्यालयाच्या स्तरावरुन नागरीकांना

वाटप करण्यात यावे असे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. त्यामुळे वयोवृद्ध नागरीक, महिला, अपंग व्यक्तींना नाहक त्रास होणार नाही याची दक्षता घेण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जावली (जि.सातारा) या तालुक्यातील महू-हातगेघर प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत

**(४०) ७५८३९ (१४-०२-२०२४). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जावळी,(जि.सातारा) या तालुक्यातील सन १९९६ मध्ये मंजूरी देण्यात आलेल्या महू-हातगेघर धरण प्रकल्पाचे काम गत २५ वर्षापासून प्रलंबित असून हा प्रकल्प पुर्ण होण्याची प्रतिक्षा दुष्काळी, डोंगराळ भागातील शेतकरी करीत असल्याचे माहे ऑगस्ट,२०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बुडीत प्रकल्पग्रस्तांना पर्यायी भूखंड वाटप झाले नसल्याने त्यांच्यामध्ये नाराजी निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन, जमिनीचा मोबदला, पर्यायी जमीन व इतर प्रश्न निकाली लावून सदर धरणाचे काम लवकरात लवकर पुर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०२४) :** (१) होय, अशंत: खरे आहे.

कुडाळी मध्यम प्रकल्प ता.जावली, जि.सातारा अंतर्गत महू येथे कुडाळी नदीवर महू धरण व हातगेघर नाल्यावर हातगेघर धरण अशी दोन धरणे नियोजित असून महू धरण १.१० अ.घ.फू. व हातगेघर धरण ०.२६ अ.घ.फू क्षमतेची असून त्यांचा एकूण पाणीसाठा १.३६ अ.घ.फू. प्रस्तावित आहे. आज अखेर धरणामध्ये १.१४४ अ.घ.फू. इतका पाणीसाठा निर्मित झालेला आहे. कुडाळी मध्यम प्रकल्पांतर्गत महू व हातगेघर धरणाचे ९५ टक्के काम पूर्ण झालेले आहे.
(२) होय, अशंत: खरे आहे.

एकूण ११८१ पात्र प्रकल्पग्रस्तांपैकी १०५२ प्रकल्पग्रस्तांना भूखंड वाटप करण्यात आलेले आहे. उर्वरित खातेदारांना भूखंड वाटपाची कार्यवाही महसूल विभागामार्फत प्रगतीपथावर आहे.
(३) सदरच्या प्रकल्पासाठी ४४८.२३ हेक्टर व प्रकल्पग्रस्तांना वाटप करावयाच्या लाभक्षेत्रातील पर्यायी जमिनीसाठी २०१८.६४ हेक्टर अशी एकूण २४६६.८७ हेक्टर क्षेत्र जमीन आवश्यक आहे. यापैकी२४५७.५७ हेक्टर क्षेत्राची भूसंपादन प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. उर्वरित ९.३० हेक्टर क्षेत्राची भूसंपादन प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. महू व हातगेघर धरणाच्या १० बाधित गावातील एकूण ११८१ पात्र खातेदारांपैकी १०५७ खातेदारांना लाभक्षेत्रातील जमिनी वाटप करण्यात आलेले आहे. उर्वरित ११३ खातेदारांना पर्यायी जमिनीऐवजी रोख रक्कम रु.३४.५१ कोटीचे वाटप महसूल विभागामार्फत करण्यात आलेले असून ११ खातेदारांना जमीन वाटपाचे काम प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नीरा-देवघर(ता.खंडाळा, जि.पुणे) पाणी प्रकल्प अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(४१) ७५९३० (१४-०२-२०२४). श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नीरा-देवघर (ता.खंडाळा, जि.पुणे) पाणी प्रकल्प बऱ्याच वर्षापासून प्रलंबित असून हा प्रकल्प केंद्र शासनाच्या माध्यमातून पूर्ण करण्याचा निर्णय दि. ०३ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पासाठी ६० टक्के निधी केंद्र शासन देणार असल्याचा निर्णय केंद्रीय जलसंपदा विभागाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्पाच्या कामाची प्रगती व सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०७-२०२४) :** (१) होय.

(२) होय.

केंद्र शासनाच्या PMKSY-AIBP योजनेअंतर्गत निरा देवघर प्रकल्पाच्या उर्वरित कामांपैकी DPAP भागात करावयाच्या कामांच्या एकूण किमतीच्या ६०% व इतर उर्वरित कामांच्या एकूण किमतीच्या २५% निधी केंद्र सरकार मार्फत देण्याबाबत प्रस्तावित आहे. निरा देवघर प्रकल्पाचा समावेश केंद्र शासनाच्या PMKSY-AIBP योजनेत करण्याबाबत दि.०५.०१.२०२४ रोजी SCREENING COMMITTEE FOR PMKSY-AIBP PROJECTS ची बैठक झाली असून सदर बैठकीतील चर्चेनुसार जलशक्ती मंत्रालाने दि.१५.०१.२०२४ रोजीच्या पत्रान्वये निरा देवघर प्रकल्पाचा समावेश केंद्र शासनाच्या PMKSY-AIBP योजनेत करण्यास मान्यता दिली आहे. त्यानुषंगाने दि.२६.०२.२०२४ रोजी निती आयोगाची बैठक झाली असून, केंद्रीय मंत्रिमंडळाची मान्यता मिळणेबाबतची कार्यवाही प्रगतीत आहे.

(३) निरा देवघर प्रकल्पांतर्गत निरा देवघर धरण, मुख्य कालवा किमी १ ते ६५ पुर्ण झालेली असून किमी १ ते १० मधील अस्तरीकरणाचे काम पुर्ण झालेले आहे. तसेच, वेनवडी उपसा सिंचन योजनेचे काम अंतिम टप्प्यात आहे. मुख्य कालवा किमी ६६ ते ८७, शाखा कालवा किमी १ ते ३०, डावा कालवा, लघुवितरिका क्र. ३८ ची कामे प्रगतीपथावर आहेत.

निरा देवघर उजवा मुख्य कालवा किमी ८८ ते १५८ ची अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली असून, त्यानुषंगाने पुढील कार्यवाही प्रगतीपथावर आहे. प्रकल्पांतर्गत गावडेवाडी, शेखमिरवाडी व वाघोशी या उपसा सिंचन योजनांचे सर्वेक्षण पुर्ण झालेले असून, परिगणके अंतिम करण्यात आलेली आहेत. सदर उपसा सिंचन योजनांचे संकल्पन मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना यांचेमार्फत प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर येथील किंग्सवे हॉस्पिटल,सीताबर्डी किल्ल्या जवळ झालेल्या उंच इमारतीच्या बांधकामाबाबत

**(४२) ७६४८१ (१७-०२-२०२४). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या संरक्षण मंत्रालयाने दिनांक १८ मे २०११ रोजी मार्गदर्शक तत्त्वे जारी केली असून संरक्षण आस्थापनांपासून ५०० मीटरच्या परिघात बांधकामांना मनाई केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर येथील किंग्सवे हॉस्पिटल सीताबर्डी किल्ल्याजवळ बहुमजली इमारतीचे बांधकाम युनिफाइड डेव्हलपमेंट कंट्रोल आणि प्रमोशन रेग्युलेशन आणि संरक्षण मंत्रालयाने जारी केलेल्या दिनांक १८ मे, २०११ च्या मार्गदर्शन तत्वाचे उल्लंघन करुन करण्यात आले असल्याने सदरहू इमारतीचा वापर ताबडतोब थांबविणे, त्यानंतर बांधकाम पाडणे, दंड आकारणे आणि नियमात बसणारी इतर कारवाई करणें अपेक्षित असतांना कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नियमांचा भंग केल्याप्रकरणी संबंधितांविरुद्ध कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०४-०७-२०२४) :** (१) व (२) हे खरे नाही.

संरक्षण विभागाच्या दि. १८ मे. २०११ च्या मार्गदर्शक तत्वानुसार संरक्षण विभागाच्या आस्थापनेपासून ५०० मीटरच्या परीधात बांधकाम करणेपूर्वी संरक्षण विभागाच्या ना हरकत प्रमाण पत्र घेणे बाबतच्या सूचना संरक्षण विभागाने निर्गमित केलेल्या होत्या. तथापि सदर मार्गदर्शक तत्त्वे संरक्षण विभागाने दि. २१.१०.२०१६ रोजी सुधारीत केलेली आहेत. त्यानुसार संरक्षण विभागाच्या आस्थापने पासून १० मीटर परीघातील बांधकामाना संरक्षण विभागाचे ना हरकत प्रमाण पत्र घेणे बंधनकारक करण्यात आलेले आहेत. सदर दि. २१.१०.२०१६ रोजीच्या मार्गदर्शक तत्वास अनुसरून महाराष्ट्र राज्यात अंमलबजावणी करणेकामे महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने दि. ०७.११.२०१६ रोजीच्या परीपत्रकानुसार संरक्षण विभागाने दि. २१.१०.२०१६ रोजी निर्गमित केलेल्या परीपत्रकाचा अंमल करणेबाबत आदेशित केलेले आहे. त्यानूसार विषयांकीत जागा संरक्षण विभागाच्या आस्थापनेपासून ३५०.०० मी. अंतरावर असल्याने संरक्षण मंत्रालयाच्या मार्गदर्शन तत्वांचे व MRTP कायदयाचे उल्लंघन झालेले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बोरगांव (ता.देवरी, जि.गोंदिया) येथील शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान झाल्याबाबत**

**(४३) ७६६८६ (१३-०२-२०२४). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरगांव (ता.देवरी, जि.गोंदिया) येथील शेतकऱ्यांना शिवाजी तांदळाचे वाण न देता खराब धान दिल्याने शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान झाल्याचे दिनांक १७ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान भरपाई देण्याबाबत तसेच बोगस बियाणांचा पुरवठा करणाऱ्या कंपनीविरुध्द कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (०९-०७-२०२४) :** (१ ) हे खरे आहे.

(२) बोरगांव (ता.देवरी, जि.गोंदिया ) येथील शेतकरी यांची तक्रारी प्राप्त होताच तालुका तक्रार निवार समिती, ता.देवरी यांनी मोका तपासणी करुन चौकशी अहवाल शेतकऱ्याला दिलेला आहे. भात बियाणांच्या शिवाजी वाणा मध्ये खराब/ भेसळ आढळल्यामुळे अंदाजित ७० टक्के नुकसान झाल्याचा निष्कर्ष सदर समितीने दिला आहे. सदर प्रकरणाची सुनावणी दिनांक २८.११.२०२३ रोजी परवाना अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, गोंदिया यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली असून सुनावणी भेसळयुक्त वियाणे विक्री केलेल्या देवरी व आमगाव, जि.गोंदिया येथील २ विक्री केंद्रांचा परवाना निलंबित करण्यात आलेला आहे.

तसेच मे.वर्षिता बायो सायन्येस प्रा.लि.हैद्राबाद या उत्पादक कंपनीस कृषि आयुक्तालय स्तरावरुन कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. दिनांक १०.०१.२०२४ बियाणे उत्पादक कंपनीची सुनावणी कृषि आयुक्तालय, पुणे स्तरावर घेण्यात आली आहे. तसेच बियाणांचे संरक्षित नमुने बिज परिक्षण प्रयोगशाळा, नागपूर व दापोली येथे पाठविण्यात आले असून यासंदर्भात अहवाल प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही

---

**रिसोड व मालेगाव (जि.वाशिम) या तालुक्याच्या जलसंधारण कामांवरील स्थगिती उठविण्याबाबत**

**(४४) ७६८५१ (१४-०२-२०२४). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.राजेश एकडे (मलकापूर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रिसोड व मालेगाव (जि.वाशिम) या दोन्ही तालुक्याच्या जलसंधारण विभागाच्या २५ कोटींच्या निविदा रद्द करुन ३९ कामांना स्थगिती देण्यात आली असून इतरही विविध स्वरुपातील विकासकामांसाठी शासनाकडून निधीच मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रिसोड व मालेगाव तालुक्यातील जलसंधारणाच्या कामांवरील स्थगिती उठवून विकासकामासाठी निधी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. संजय राठोड (२८-०६-२०२४) :** (१) होय,अंशत: खरे आहे.

सदर योजनांना मजम-२०२२/प्र.क्र.१४३/जल-३, दि. ०८.०७.२०२२ अन्वये स्थगिती देण्यात आली होती.

(२) महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, छत्रपती संभाजीनगर यांचेकडून रिसोड व मालेगाव या दोन्ही तालुक्यातील जलसंधारणांच्या ३९ कामांच्या निविदावरील स्थगिती दि. २२.११.२०२३ अन्वये उठविण्यात आली असून सद्यस्थितीत महामंडळांतर्गत स्थगिती असलेल्या योजनांची संख्या निरंक असून महामंडळासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कार्यवाही सुरु असून प्रगतीपथावरील असलेली कामे टप्प्या टप्प्याने पुर्ण करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे कामखेडा (ता.रेणापूर, जि.लातूर) येथील शेतकऱ्याचे अनुदानित मंजूर बियाणे उपलब्ध झाले नसल्याबाबत**

**(४५) ७७०३९ (११-०२-२०२४). श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कामखेडा (ता.रेणापूर, जि.लातूर) येथील शेतकरी श्री.शिवाजी गणपतराव सूर्यवंशी व सौ.केवळबाई शिवाजी सूर्यवंशी यांनी शासनाच्या अनुदानित हरभरा बियाणांसाठी ऑनलाईन मागणी केल्यानंतर मंजूर झालेले बियाणे उपलब्ध झाले नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरनिर्दिष्ट शेतकऱ्याला महाबीजच्या हरभरा बियाणांची मंजुरी मिळाल्यानंतर रेणापूर कृषी कार्यालयातून हरभरा बियाणांचा परवाना घेऊन विविध कृषी दुकानात विचारणा केली असता सदरील शासन अनुदानित बियाणे शिल्लक नसल्याचे शेतकऱ्याला सांगण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शेतकऱ्यांना अनुदानित बियाण्यांची मंजुरी मिळूनही ते वेळेत उपलब्ध न झाल्याने शेतकऱ्यांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (०९-०७-२०२४) :** (१ ) हे खरे नाही,

(२) हे खरे नाही.

रब्बी हंगाम २०२३ मध्ये रेणापूर तालुक्यासाठी महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाच्या अधिकृत विविध कृषि सेवा केंद्रामध्ये एकूण १४४ क्विंटल हरभरा बियाणे वितरणासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेले होते. त्यामध्ये विजय, फुले विक्रांत या वाणाचा समावेश आहे.

पुरवठा करण्यात आलेल्या बियाणांपैकी ९६.८० क्विंटल बियाणे परमिटद्वारे शेतकऱ्यांनी उचल केलेली आहे व ४७.२० क्विंटल बियाणे महाबीजकडे शिल्लक राहिले आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाघोली (ता.केळापूर जि.यवतमाळ) येथील मंजूर पाझर तलावाच्या कामाबाबत**

**(४६) ७७१२० (१४-०२-२०२४). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाघोली (ता.केळापूर जि.यवतमाळ) येथील पाझर तलावा करिता वाघोली शे.स ग्रट.न.४४ व ४५ मध्ये सिंचन विभाग यवतमाळ मार्फत सर्वेक्षण करून लघु सिंचन मंडळ अमरावती यांनी तांत्रिक अनुमती देऊन जि.प.सर्वसाधारन सभे मध्ये तांत्रिक मंजुरी होउन सुध्दा तलावाचे काम प्रलंबीत असल्याचे दिनांक २२ ऑक्टोबंर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंजूर पाझर तलावाचे बांधकाम करण्यात आल्यास वाघोली आणि खैरगाव देशमुख परिसरातील शेतकरी यांना शेती सिंचनाचा लाभ मिळून उक्त परिसर दुष्काळ मुक्त होईल, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पाझर तलावाचे बांधकाम पुर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (०२-०७-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) मौजे वाघोली (ता.केळापूर, जि. यवतमाळ) पाझर तलावास सक्षम स्तरावरुन पाणी उपलब्ध प्रमाणपत्र मिळण्याबाबतचा प्रस्ताव प्रक्रिये अंतर्गत असून पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर सुधारित तांत्रिक मंजुरी प्राप्त करुन घेवून कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मु.पो. पनवेल, (जि. रायगड) तालुक्यातील एनके हेरिटेज या सोसायटीमधील दारू दुकानाला स्थानिक नागरिकांचा असलेला विरोध.**

**(४७) ७७३९१ (२१-०२-२०२४). :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) मु. पो. (ता. पनवेल, रायगड) रेल्वे स्थानका समोरील एनके हेरिटेज या सोसायटी मधील दुकान नंबर २८ मध्ये सुरू होणाऱ्या दारू विक्री दुकानाला त्या सोसायटीमध्ये राहणाऱ्या बहुसंख्य रहिवाशांचा तीव्र विरोध असल्याच्या लेखी तक्रारी स्थानिक राज्य उत्पादक शुल्क विभागाकडे देऊन या ठिकाणी दारू विक्रीची परवानगी देऊ नये अशी लेखी मागणी स्थानिक रहिवाशांनी केल्याचे दिनांक ०३ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोसायटीचे सचिव नरेश गायकवाड यांनी राज्य उत्पादक शुल्क विभागाने लेखी अर्जाची तातडीने दखल घ्यावी अशी मागणी केली, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, राज्य उत्पादन शुल्क विभागाने ज्या जागेत दुकान सुरू करायचे आहे. तेथील रहिवाशी विरोधात असताना सुद्धा त्या दुकानाला परवानगी देण्याचा निर्णय घेण्याचे सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) असल्यास, सदर सोसायटीमध्ये दारूचे दुकान ज्या गाळा नंबर २८ मध्ये सुरू करण्यात येणार आहे. ते दुकान दारूचे दुकान सुरू करणाऱ्याच्या स्वतःच्या मालकीच्या आहे, कि भाडतत्त्वावर घेण्यात आले आहे. याबाबतचा तपास राज्य उत्पादन शुल्क विभागाने केला आहे तसेच रहिवाशांचे ना हरकत प्रमाणपत्र दारू विक्रेता व्यक्तीने राज्य उत्पादन शुल्क विभाग कडे सादर केला आहे काय ?

**श्री. शंभूराज देसाई (०२-०७-२०२४) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) मे. पनवेल वाईन्स, एफएल-२ क्र. ४१ व संलग्न सीएल/एफएल/टीओडी-३ क्र. ४१, शॉप नं. १-२, यमुना कॉम्प्लेक्स, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड ही अनुज्ञप्ती शॉप नं. २८, ई-विंग, एनके हेरिटेज, को. ऑप. हौ. सो. लि., पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड येथे स्थलांतरण करण्यासाठी अनुज्ञप्तीधारकांनी अधीक्षक, राउशु, रायगड कार्यालयास दि. १८.०४.२०२३ रोजी अर्ज सादर केला आहे.
सदर स्थलांतरणाच्या अनुषंगाने एनके हेरिटेज को. ऑप. हौ. सो. लि., पनवेल या रहिवासी गृहनिर्माण संस्थेचा तक्रार अर्ज प्राप्त झाल्याने सदर स्थलांतर प्रस्तावास अद्यापपर्यंत मान्यता देण्यात आलेली नसून प्रस्ताव प्रलंबित आहे.
(४) सदर अनुज्ञप्ती स्थलांतरणाची प्रस्तावित जागा अनुज्ञप्तीधारकांच्या स्व-मालकीची असून त्यांनी दि. ०९.०५.२०२२ रोजीचे नोंदणीकृत विक्री करार (Sale Deed) सादर केलेले आहे. तसेच, अनुज्ञप्तीधारकांनी अनुज्ञप्ती स्थलांतरणाकरिता प्रस्तावित जागेतील रहिवासी/सोसायटीचे ना-हरकत प्रमाणपत्र सादर केलेले नाही.

---

### वाडा (ता. खेड, जि.पुणे) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील सौरप्रणाली कार्यान्वित करण्याबाबत

**(४८) ७७३९८ (२१-०२-२०२४). श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाडा (ता. खेड, जि.पुणे) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील सौरप्रणाली गेल्या दोन वर्षापासून कार्यान्वित नसल्याचे माहे ऑक्टोबर २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सौरप्रणाली कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०२४) :** (१) होय.
(२) प्राथमिक आरोग्य केंद्र वाडा ता. खेड. जि. पुणे येथील इमारतीवर १० कि.वॅ. क्षमतेचा पारेषण संलग्न सौर ऊर्जा प्रकल्प आस्थापित करण्यासाठी मे. सोनकुल एनर्जी प्रॉडक्टस प्रा. लि. अहमदनगर यांना महाऊर्जा, पुणे यांचेकडून दि. ०६ एप्रिल २०२१ रोजी कार्यादेश देण्यात आला. त्यानुषंगाने सदर इमारतीवर दि. १६ जून २०२१ रोजी सौर ऊर्जा प्रकल्प आस्थापित करण्यात आला.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या नियमावलीनुसार प्राथमिक आरोग्य केंद्र वाडा, ता. खेड. जि. पुणे येथील मंजूर भार वाढविणे व थकीत वीज देयकाची अदायगी झाल्यानंतर दि. २८ जुलै, २०२३ रोजी प्रकल्पाच्या ठिकाणी नक्तमापन प्रणाली आस्थापित व कार्यान्वित करणेकरिता महावितरणकडे अर्ज दाखल करण्यात आला असून दि. १४ ऑगस्ट, २०२३ रोजी मीटरची चाचणी पूर्ण झाली आहे. सदर इमारतीवरील सौर ऊर्जा प्रकल्प दि. ०४ डिसेंबर, २०२३ रोजी कार्यान्वित झाला आहे.
३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अनुदानीत आदिवासी आश्रमशाळेतील कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत

**(४९) ७७९७३ (१३-०२-२०२४). श्री.अनिल देशमुख (काटोल), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुदानीत आश्रम शाळेतील कर्मचाऱ्यांनी दिनांक ८ जून, २०१६ चा शासन निर्णय व क्षमता परीक्षा रद्द करणे तसेच चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना रजा देणे यासह विविध मागण्या शासनाच्या आदिवासी विभागाला करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासनामार्फत कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (२६-०६-२०२४) :** (१) होय

(२) आदिवासी विकास विभागांतर्गत राज्यात स्वयंसेवी संस्थाकडून आदिवासी विद्यार्थ्यांसाठी चालविल्या जाणाऱ्या मान्यताप्राप्त अनुदानित आश्रमशाळा, शासनाच्या ध्येय धोरणानुसार चालविल्या जात नसल्यामुळे अशा आश्रमशाळांची मान्यता रद्द करण्यात येते. आश्रमशाळांची मान्यता रद्द केल्यानंतर अशा शाळांतील कायम मान्यता प्राप्त शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे नियमानुसार समायोजन होईपर्यंतच्या कालावधीत काम नाही, वेतन नाही हे धोरण सामाजिक न्याय विभागाच्या दिनांक ०१.०४.२०१६ रोजीच्या शासन निर्णयाच्या धर्तीवर दिनांक ०८ जून, २०१६ च्या शासन निर्णयान्वये लागू करण्यात आले आहे. तथापि विद्यार्थी संख्या कमी झाल्यामूळे आश्रमशाळेचा एखादा वर्ग/तुकडी कमी झाल्यास मात्र शाळा सुरु असल्यास अतिरिक्त ठरलेल्या शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन बंद न करता त्यांचे समायोजन होईपर्यंत त्यांचे वेतन चालू ठेवण्याबाबत दिनांक २९ एप्रिल, २०१७ च्या शासन निर्णयान्वये सूचना देण्यात आल्या आहेत.

आदिवासी विकास विभागांतर्गत कार्यरत शासकीय व अनुदानित आश्रमशाळेतील शिक्षकांचे ज्ञान वृध्दीगत व्हावे, त्यांना स्वयंअध्ययनाची आवड निर्माण व्हावी, स्पर्धात्मक वातावरणात स्वत:ची गुणवत्ता सिध्द करण्याची संधी मिळावी व विद्यार्थ्यांना चौफेर ज्ञान देण्यासाठी शिक्षकांची क्षमता अधिक दृढ व्हावी या हेतूने आदिवासी विकास विभागांतर्गत शासकीय व अनुदानित आश्रमशाळेतील शिक्षकांची क्षमता परीक्षा आयोजित करण्यात येते.

राज्यातील अनुदानित आश्रमशाळेतील मुख्याध्यापक, अधिक्षक, कामाठी, लिपिक, सफाई कामगार, पहारेकरी व शिपाई यांना आश्रमशाळा संहिता २०१९ नुसार प्रकरण ४.३ मधील ४.३.७ मधील तरतूदीनुसार दिर्घ सुट्टी देय नाही. तथापि त्यांना नियमानुसार किरकोळ, अर्जित व वैद्यकीय रजा मंजूर केली जाते.

(३) प्रश्न उद्भवत नाही

---

### मौजे रनाळे (जि.नंदूरबार) साठवण तलाव निंभेल व आसाणे या प्रकल्पाची भूसंपादन प्रक्रिया पुनश्च: करण्याबाबत

**(५०) ७९३२३ (०९-०५-२०२४). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे रनाळे (जि.नंदूरबार) येथील साठवण तलाव निंभेल व आसाणे या प्रकल्पाची भूसंपादन प्रक्रिया सन २०१४ ते माहे ऑक्टोबर, २०२३ पर्यंत पूर्ण झाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भूसंपादन प्रक्रिया पूर्ण न झाल्याने नव्याने राबवून शेती मालमत्तेची शासकीय व खाजगी खरेदी विक्रीच्या दराप्रमाणे मुल्यांकन परिगणना करुन शेतकऱ्यांना भूसंपादन मोबदला देऊन प्रकल्पाचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबतची

मागणी शेतकऱ्यांनी शासनाकडे माहे ऑक्टोबर २०२३ मध्ये वा त्या दरम्यान लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकल्प हा नंदूरबार व शिंदखेडा तालुक्यातील अवर्षण भागाकरिता संजीवनी देणारा असल्याने तातडीने पूर्ण करण्याकरीता शेतकऱ्यांनी दिनांक १२ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास रास्ता रोको उपोषण केले असून अनेक वेळा जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांकडे लेखी निवेदनाव्दारे मागणी करुनही कार्यवाही करण्यास जाणीवपूर्वक विलंब होत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन भूसंपादन केलेल्या शेतकऱ्यांना नव्याने भूसंपादन प्रक्रिया राबवून कलम ११ ची अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिध्द करुन शासकीय व खाजगी खरेदी विक्रीच्या दराप्रमाणे मुल्यांकन परिगणना करुन भूसंपादन मोबदला देऊन प्रकल्पाचे काम तातडीने पूर्ण करण्याकरिता कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०७-२०२४) :** (१) होय, अंशत: खरे आहे.

सन २०१३ पासून भूसंपादन प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. निंभेल व आसाने हे दोन्ही साठवण तलाव प्रकाशा बुराई उपसा सिंचन योजने अंतर्गत समाविष्ठ आहेत. निंभेल साठवण तलावासाठी १०५.३९ हे. भूसंपादन क्षेत्रापैकी ६८.८७ हे. क्षेत्र संपादित केले असून उर्वरित ३६.५२ हे. क्षेत्र संपादित करावयाच्या कार्यवाहीत आहे. तसेच आसाणे साठवण तलावासाठी १५६.३० हे. क्षेत्र संपादनाची कार्यवाही प्रगतीत आहे.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

दि.०६.०९.२०२३ रोजीच्या पत्रान्वये तापीबुराई जलसंघर्ष समिती समस्त गावे यांनी तापीबुराई प्रकल्प पूर्ण न झाल्यामुळे रस्ता रोको आंदोलन करण्याबाबत कळविले होते.त्यानुसार तापी बुराई जल संघर्ष समितीने सदर उपसा सिंचन योजना तात्काळ पूर्ण करण्यात यावी या करिता दि.१२/०९/२०२३ रोजी रास्ता रोको आंदोलन केले होते. परंतू त्यात भुसंपादनाची मागणी नव्हती. भुसंपादन कार्यवाही प्रगतीत होती. त्यावेळेस कार्यकारी अभियंता यांनी सदर संघर्ष समितीला प्रत्यक्ष भेट देऊन सुप्रमा प्राप्त झाल्यानंतर तात्काळ योजनेचे काम सुरु करण्यात येईल असे आश्वासन केले व रास्ता रोको आंदोलन मागे घेण्यात आले.

(४)साठवण तलाव निंभेल ता.जि. नंदुरबार

| जमिनीचा प्रकार | आवश्यक | संपादीत | उर्वरीत |
|---|---|---|---|
| खाजगी | १०५.३९ हे | ६८.८७ हे | ३६.५२ हे. |

उर्वरीत ३६.५२ हे. खाजगी क्षेत्रापैकी २५.०० हे. आर क्षेत्राची थेट खरेदी सुरु आहे. उर्वरीत ११.५२ हे.आर. क्षेत्राचे जिल्हाधिकारी, नंदुरबार यांचे अध्यक्षतेखालील थेट खरेदी मुल्यांकन समितीने मंजुर थेट खरेदी किंमत भुधारकांना मान्य नसल्याने सदर प्रस्ताव भुसंपादन कायद्या २०१३ नुसार सहाय्यक जिल्हाधिकारी, नंदुरबार भाग, नंदुरबार यांचे कडे कार्यान्वित असुन सदर प्रस्तावाची भुसंपादन अधिनियमाचे कलम-१९ झाली असुन पुढील कार्यवाही प्रगतीत आहे.

साठवण तलाव आसाणे ता.जि. नंदुरबार

| जमिनीचा प्रकार | आवश्यक | संपादीत | उर्वरीत |
|---|---|---|---|
| खाजगी | १५६.३०हे. | ०.०० | १५६.३०हे. |

सदर खाजगी जमीनीचा भूसंपादन प्रस्तावाची भुमी संपादन अधिनियम-२०१३ अंतर्गत कलम-११ ची अधिसूचना प्रसिध्दी झालेली असुन पुढील कार्यवाही सहा. जिल्हाधिकारी, नंदुरबार भाग, नंदुरबार यांचे कडे प्रगतीत आहे.

सदर योजनेस शासन निर्णय क्र. सुप्रमा-२०१९/६३८/(प्र.क्र.२०३/१९)/ मध्यम प्रकल्प दि.१५/०३/२०२४अन्वये रु.७९३.९५ कोटी किंमतीच्या सुधारित प्रथम सुप्रमास मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदर योजनेच्या कामावर मे २०२४ अखेर रू.११८.५६ कोटी एवढा खर्च झालेला असून, सन २०२४-२५ या आर्थिक वर्षा करिता रू.१७.१५ कोटी निधीची अर्थसंकल्पिय तरतूद करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.